# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती

ISSN : 2584-0398

वर्ष तिसरे । अंक सातवा । जुलै २०२४




## इस्लामपूर येथे विस्तारीत राज्य कार्यकारीणी बैठक उत्साहात संपन्न

## विस्तारीत राज्य कार्यकारीणी बैठक : इस्लामपूर (सांगली) : क्षणचित्रे

### मनोगत व्यक्त करताना



आमदार जयंतरावजी पाटील



डॉ. भारत पाटणकर



उत्तम कांबळे



किशोर बेडकीहाळ



महेश मोरे (नाना)



राज्य अध्यक्ष
भाई अविनाश पाटील



राज्य उपाध्यक्ष
प्रा. शामराव पाटील (अण्णा)



राज्य कार्याध्यक्ष
माधव बावगे



इस्लामपूरात संविधान जनजागृती फेरी



संयोजक टीम इस्लामपूर

विज्ञान निर्भयता नीती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

आम्ही वारस विवेकाचे

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

**R.N.I.No. MAHMAR/2022/83669**

**वर्ष तिसरे । अंक सातवा । जुलै २०२४**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय...** ४
- **विचारमंथन**
  - भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल / किशोर बेडकिहाळ ५
- **अभिवादन**
  - आगरकर : देव न मानणारा देवमाणूस/जगदीश काबरे ९
  - सावित्रीबाई : पहिली बंडखोर समाजसुधारक / अरुणा दिवेगावकर १२
  - क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य / प्रा. संध्या राजुरकर १५
  - सुपाएवढ्या काळजाचा डोंगराएवढा माणूस : एन. डी. पाटील / एकनाथ पाटील १६
- **प्रासंगिक**
  - सर्वांगीण लैंगिकता शिक्षण / सचिन थिटे १८
- **कविता**
  - थोडे तुझे थोडे माझे / सीताराम नरके २१
  - अभंग / पुरुषोत्तम ठाकरे २१
- **वृत्तांत**
  - तरुणाईला भावलेली 'सोच' : महा. अंनिस युवा छावणी २२
  - विस्तारीत राज्य कार्यकारिणी बैठक २५
  - पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण ३०
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३४


**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे

- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली ४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  आरबाज पटेल (७७७६०६१८३३)

- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर
- **स्वागतमूल्य : ₹ २०/-**
- **पृष्ठ संख्या : ४०**

**वार्षिक वर्गणी**

४०० रू. (व्यक्तीसाठी) ५०० रू. (संस्थेसाठी)

**वर्गणी/देणगी पाठविण्याची सुविधा :**

**विवेक जागर संस्था**
ICICI **बँक, धुळे**
**खाते नंबर :** 646301002757
IFSC Code : ICIC0006463

Scan & Pay

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhshradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

## विषमता गडद होते आहे ...

भारताचे संविधान हे भारतीयांच्या उज्ज्वल भवितव्याचे सौंदर्य सिद्धांतन आहे. न्याय, स्वातंत्र्य समता, बंधुता अशा ज्या मूल्यांची भारतीय समाजात शतकानुशतके पायमल्ली होत राहिली त्यांचा अंगीकार करण्याचा संकल्प संविधानाद्वारे आपण केला आहे. या मूल्यांवरील निष्ठा जाहीर करूनच ९ ऑगस्ट १९८९ ला महा. अंनिसने विज्ञाननिष्ठ, विषमतारहित, शोषणरहित व्यापक समाजपरिवर्तनाच्या कार्यास सुरुवात केली. समितीच्या पंचसूत्रीतील पहिल्या सूत्रातच शोषणाला विरोध जाहीर केलेला आहे. तसेच समितीचे उद्दिष्ट धर्म, जात, पंथ, लिंग, भाषा, प्रांत अशा कोणत्याही भेदांच्या आधारे निर्माण होणाऱ्या, केल्या जाणाऱ्या विषमतेच्या विरोधात समता प्रस्थापित करण्याचे आहे. धर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यांची विधायक आणि कृतिशील चिकित्सा करणारी ही लोकचळवळ आहे. त्यामुळे अशीच उद्दिष्टे, याच संविधानिक मूल्यांवर आधारित ज्या संस्था व समविचारी संघटना कार्य करतात त्यांच्याशी महा. अंनिस समन्वय साधते.

महा. अंनिसच्या स्थापनेला ३५ वर्षे पूर्ण होतांना व्यापक परिवर्तनाची उद्दिष्टे कितपत साध्य झाली याचा आढावा घेतल्यास असे दिसते की, समितीचे कार्य वाढत असले तरी देशातील एकंदर परिस्थिती अधिकच बिकट होते आहे. विषमता ही राजकीय, सामाजिक आणि आर्थिक अशा तीन पातळ्यांवर असते. ती नाहीशी करण्यासाठी आपण लोकशाही समाजवादाचा मार्ग स्वीकारला. आरक्षणाचे कायदे करून राजकीय समानता स्थापित करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी जातिधर्माधारित राजकारणामुळे ती अद्यापही साध्य झालेली नाही. लोकशाही ही बहुमतावर आधारित असली तरी ती बहुसंख्याकांची हुकुमशाही नसावी. मात्र, आज तोच धोका देशासमोर उभा आहे का? यावर विचार करण्याची वेळ आली आहे.

दुसरी आहे सामाजिक समता. समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक विषमता आणि परंपरागत अन्याय, अत्याचार यांच्या विरोधात संरक्षण मिळावे यासाठी कायदे झाले. स्वातंत्र्यानंतर याबाबत प्रबोधन करणाऱ्या अनेक समाजसेवी संस्था पहिली चार दशके जोमाने कार्यरत होत्या. परंतु नव्वदच्या दशकानंतर जमातवादी शक्ती उफाळून आल्याने जातिधर्माधारित अन्याय, अत्याचार वाढले. झुंडबळी होत आहेत. बलात्काऱ्यांच्या समर्थनार्थ राजकीय पक्षांची मोर्चे काढण्यापर्यंत मजल गेलेली आहे. बलात्कारी विशिष्ट जातिधर्माचे असल्यामुळे 'संस्कारी' असल्याचे प्रमाणपत्र देत त्यांना शिक्षेच्या कालावधीपूर्वीच सोडून देण्यात येते. मणिपूरमध्ये महिलांची विटंबना झालेली जगाने पाहिली; त्यामुळे आपल्या 'विश्वगुरु' होण्याच्या केवळ वल्गनाच आहेत. सामाजिक समतेसाठी या सर्व चिंताजनक बाबी आहेत.

तिसरी आर्थिक समता. भारतात जगातील अतिश्रीमंत लोकांच्या यादीतील काही थोडे लोक एकीकडे राहतात तर दुसरीकडे वाढत्या बेरोजगारीमुळे बहुसंख्यांना ५ किलो धान्य मोफत देण्याची वेळ येते. आदिवासींना त्यांच्या परंपरागत जमिनींपासून बेदखल केले जाते. देशाची साधनसंपत्ती आणि संसाधनांवर मूठभर धनदांडग्यांची मालकी प्रस्थापित होते आहे. भारतातील आर्थिक विषमता वाढत असल्याचे विविध संस्थांच्या सर्वेक्षण अहवालात दरवर्षी नमूद होते आहे.

व्यापक समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये ज्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समानता अपेक्षित आहेत त्याबाबत मात्र विषमताच गडद होत असल्याचे चित्र दिसून येते. याउलट ज्या काळी गंभीर विषमता होती त्या काळात म्हणजे शिवाजी महाराजांपासून तर फुले, आगरकर, छत्रपती शाहू, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी अशा महापुरुषांनी जे समाजपरिवर्तनाचे कार्य केले त्यास सकारात्मक प्रतिसाद लाभला. हा सकारात्मक प्रवास कसा झाला, सर्वसमावेशक भारतीय राष्ट्रवाद कोणता, त्याच्या वाटचालीचा तपशिलाने आढावा घेणारा लेख या अंकात समाविष्ट आहे. धार्मिक अवडंबर टाळूनही समाजात नैतिकता वाढीस लागू शकते अशी भूमिका घेणारा 'देव न मानणारा देवमाणूस' याच अंकातून जाणून घेता येईल.

अतिथी संपादक
**डॉ. सुशील मेश्राम**

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

विचारमंथन



# भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल

**किशोर बेडकिहाळ** । सातारा
९७७५०२०९४४

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या इस्लामपूर येथील विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत दि. ३१ मे, २०२४ रोजी ज्येष्ठ विचारवंत मा. किशोर बेडकिहाळ यांनी 'भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल' या विषयावर मांडलेले विचार (पूर्वार्ध)**

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विचारपीठावरील मान्यवर, आणि या शिबिरासाठी जमलेल्या सर्व मित्र-मैत्रिणींनो,

'भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल' या विषयाबाबत आपल्या सगळ्यांचे समज, गैरसमज पुष्कळ आहेत. 'भारत हे एक राष्ट्र आहे' या विधानात वास्तविकता असली तरी आशयाच्या अंगाने आपण एक राष्ट्र आहोत अशी अजूनही परिस्थिती नाही. अनेकांना असे वाटते की, राष्ट्र ही संकल्पना खूप प्राचीन आहे आणि भविष्यात ती तशीच राहणार आहे, हीच एक मोठी अंधश्रद्धा आहे. राष्ट्र ही आधुनिकतेचा विचार जन्माला आल्यानंतरच्या काळात निर्माण झालेली अलीकडच्या चार-पाचशे वर्षांतील संकल्पना आहे आणि विशेषतः या संकल्पनेला भांडवलशाहीचा संदर्भ आहे.

भरतावरून भारत झाला; असा 'भारत' नावाचा उल्लेख महाभारता-मध्ये असला तरी राष्ट्र संकल्पनेला आवश्यक असणाऱ्या पायाभूत गोष्टी आपल्याकडेच काय जवळपास जगभरच अस्तित्वात नव्हत्या. अगदी सुरुवातीच्या राज्यसत्ता म्हणून वावरणाऱ्या इंग्लंड, फ्रान्स, रशिया अशा राष्ट्रांनी जेथे जेथे वसाहती केल्या त्यातल्या काही वसाहती राज्य म्हणून, राष्ट्र म्हणून इतिहासामध्ये उदयास आलेल्या दिसतात. त्यात अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका आणि ब्रिटिशांच्या अंकित असणाऱ्या वसाहती होत्या. शिवाय आशियातील वसाहतीत आजचा भारत, श्रीलंका, पाकिस्तान, ब्रह्मदेश या सगळ्यांमध्ये राष्ट्रीय जाणिवांचा उदय व्हायला लागला. त्यांना स्वतंत्र राष्ट्र म्हणून उभे राहायला विसाव्या शतकाचा उत्तरार्ध उजाडावा लागला. ज्या लोकसंख्येच्या एखाद्या प्रदेशावर एकच एक राजकीय सत्तेचा एकछत्री अंमल दीर्घकाळ असतो तो भूभाग राष्ट्र म्हणून मान्यता पावतो.

येनकेन प्रकारेण १८१८ साली ज्या वेळेला मराठ्यांचे राज्य अस्ताला गेले आणि १८४०-४९ च्या दरम्यान रणजित सिंग यांचे राज्य जेव्हा संपले त्या वेळेला सबंध भारतावर ब्रिटिशांची एकछत्री सत्ता प्रस्थापित झाली आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने भारत हा एकछत्री अंमलाखाली आला. तेव्हा जवळपास ५६५ संस्थानिक आणि त्यांची संस्थाने या भूप्रदेशावर होती. त्यापूर्वी सबंध इतिहासकाळामध्ये लढाया, आक्रमणे, शरणागती, मांडलिकत्व अशा विविध कारणांमुळे अनेक राजवटींच्या अंमलाखालील प्रदेशांच्या सरहद्दी वारंवार बदलत राहिलेल्या आहेत. भारत कायम विविध राजवटींमध्ये विभागलेला असल्याने त्याच्यावर एकच एक राजकीय सत्तेचे छत्र कधीच राहिले नाही. आपण जर असे मानले की, मोगलांचे साम्राज्य हे तुलनेने सगळ्यात जास्त मोठे आणि जवळपास ६-७ शतके त्यांनी राज्य केले तरीसुद्धा दक्षिणेकडे मोगलांना फारसा राज्यविस्तार करता आला नाही. शिवाजी महाराजांचे राज्य त्यांना उलथवता आले नाही. त्यांचा सगळा भाग उत्तरेकडचा राहिला. मोगल राजवटीच्या परिणामी आपल्या लक्षात न येणारी गोष्ट अशी असते की, भारताच्या फाळणीचा सगळा प्रश्न हा उत्तर भारताचा प्रश्न होता, दक्षिण भारताचा नव्हता.

त्या एकछत्री अंमलाखाली त्या काळामध्ये भारत, आजचा बांगलादेश, पाकिस्तान आणि ब्रिटिशांनी आपल्याला जोडलेला ब्रह्मदेश हे प्रदेश होते. ब्रह्मदेश आणि अफगाणिस्तान हे सुद्धा ब्रिटिशांनी आपल्याला जोडलेले होते; ते मूळचे भारतीय असण्याचा काही संबंधच नाही. एकछत्री अंमल झाल्यामुळे भारताच्या राष्ट्रीयत्वाची किंवा राष्ट्र म्हणून उदयाला येण्याची एक पायाभूत अट निर्माण झाली. तरीसुद्धा आपले राष्ट्र निर्माण होण्याला दोन-तीन प्रकारचे अडथळे त्याही काळात होते. हे मुद्दाम यासाठी सांगितले पाहिजे की, कोणकोणत्या आव्हानांचा सामना करून हे 'भारत' राष्ट्र उभे राहिले

आहे हे आपल्याला ज्ञात असले पाहिजे. कारण आपल्या राष्ट्रवादाची अवस्था फार बिकट आहे आणि राष्ट्राच्या स्वरूपाची अवस्था त्याहूनही बिकट झालेली आहे. भारत हे कधीही एक राष्ट्र होऊ शकणार नाही अशी एक धारणा ब्रिटिश प्रशासकांची, नोकरशहांची त्या काळामध्ये दिसते. १८८८ मध्ये जॉन स्ट्रॅची नावाचा प्रशासक होता. तो इंग्लंडला परत गेल्यानंतर त्याने जे 'इंडिया' नावाचे पुस्तक लिहिले त्यात तो म्हणतो, "India cannot be a nation, hence there cannot be democracy in India'. भारत कधीही एक राष्ट्र होऊ शकणार नाही आणि त्यामुळे भारतात कधीच लोकशाही स्थापित होऊ शकणार नाही. हे त्याचे जे निरीक्षण होते, ते कशाच्या आधारावर होते? त्याने असे म्हटले आहे की, भारत हा विविध भाषा, प्रांत, विविध जाती, धर्म यांच्यामध्ये विभागलेला आहे आणि त्यामुळे एकाचा पायपोस दुसऱ्याच्या पायात नाही. त्यामुळे पंजाबमधल्या लोकांबद्दल, बंगालमधल्या लोकांबद्दल उर्वरित भारतातल्या लोकांना काहीही वाटणार नाही; आणि त्यामुळे ते कधीही एकत्र येणार नाहीत. त्यांच्यातील भेदांमुळे भारत हे कधीही एक राष्ट्र होऊ शकणार नाही. व्ही. एस. नायपॉल नावाचे एक कादंबरीकार आहेत. त्यांनी असे एक विधान केलेले होते की, 'भारत हे एक राष्ट्र होऊ शकणार नाही'. कारण भारत जवळपास चार हजार वर्षांपूर्वी जिथे होता तिथेच आजही आहे, हे नायपॉल यांचे निरीक्षण होते.

१८५७ च्या उठावानंतर ब्रिटिश नोकरशाहीची अशी मानसिकता झाली होती की, त्यातून त्यांनी एक राष्ट्रीयत्व निर्माण करण्यात जेवढे अडथळे आणता येतील तेवढे अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. एका बाजूला त्यांनी हिंदू-मुस्लीम फुटीला उत्तेजन दिले, दुसऱ्या बाजूला विविध जातिजमातींतील वेगळेपण अधोरेखित केले, दलितांना सवर्णांपासून तोडून वेगळे करण्याचा डाव टाकला. त्यांच्या या प्रयत्नांवर मात करून भारत नावाचे एक राष्ट्र उभे राहिलेले आहे. याआधी म्हटल्याप्रमाणे एक राष्ट्र असण्यासाठीची एकछत्री राज्यसत्तेचा अंमल असण्याची एक पायाभूत अट भारतात एकछत्री ब्रिटिश अंमलाच्या रूपाने पूर्ण झाली. राज्य ब्रिटिशांचे होते, पण वास्तव्य भारतीयांचे होते. या राष्ट्राच्या उभारणीमध्ये, राष्ट्राच्या जन्मापासूनच दोन गोष्टी कायम आधारभूत राहिलेल्या आहेत. त्यातील एक गोष्ट आहे, लोकशाही आणि दुसरी आहे, धर्मनिरपेक्षता. हे यासाठी समजून घेतले पाहिजे की, भारताचा जन्म होतांना म्हणजे भारतामध्ये राष्ट्रीय जाणिवेचा उदय होऊन त्याचे काँग्रेसच्या रूपाने १८८५ मध्ये एका संघटनेत रुपांतर झाले. या दरम्यानच्या वसाहतकाळामध्ये १८२० ते १८८५ या कालखंडात भारतामध्ये राजकीय, सामाजिक, व्यापारी किंवा आर्थिक अशा विविध प्रश्नांच्या संदर्भाने अनेक प्रकारच्या संघटना निर्माण झालेल्या आपल्याला दिसतात. त्यातून अनेक प्रकारच्या सामाजिक आणि राजकीय चळवळी निर्माण झाल्या. पुण्यामध्ये १८७० ला सार्वजनिक सभा निर्माण झाली, लँड ओनर्स असोसिएशन, ग्रॅज्युएट्स असोसिएशन, मद्रास प्रेसिडेंन्सी असोसिएशन आणि बंगालमध्ये अशाच काही संस्था निर्माण झाल्या. या सगळ्या संस्थांनी आपल्या व्यवहारांमध्ये लोकशाहीचे सूत्र कायम ठेवले होते. आणि त्याचे एक कारण असे आहे की, ब्रिटिशांनी भारतात आल्यानंतर क्रमाक्रमाने ज्या संस्था निर्माण करायला सुरुवात केली त्या लोकशाही स्वरूपाच्या होत्या. इंग्लंडचा भारतातला प्रतिनिधी व्हॉईसरॉय असायचा. त्याने इथे क्रमाक्रमाने मध्यवर्ती लोकशाही कारभार करायला सुरुवात केली होती. त्याची आजच्या मंत्रिमंडळाच्या स्वरूपातील एक कौन्सिल असायची. ब्रिटिशांनी जे इलाखे केलेले होते त्या प्रत्येक इलाख्यामध्ये जवळपास आठ ते नऊ प्रांत होते. १९३७ च्या आठ प्रांतांच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसची मंत्रिमंडळे निवडून आल्याची आपल्याला इतिहासात नोंद सापडते. या प्रांतिक मंत्रिमंडळांची रचना आजच्या मध्यवर्ती लोकशाहीसारखी होती. जिल्ह्याला लोकल बोर्ड्स किंवा डिस्ट्रिक्ट प्रेसिडेन्सी असायचे. ब्रिटिशांनी राज्यकारभारासाठी केलेली ही सर्व रचना लोकशाही स्वरुपाची होती.

ब्रिटिशांच्या इंग्रजी शिक्षण पद्धतीतून शिक्षित झालेला एक वर्ग होता; त्याने इंग्रजी वाङ्मय वाचलेले होते. त्यातून त्याला इंग्रजांच्या राज्यकारभाराची, कायदेपद्धतीची, इंग्लंडच्या समाजशास्त्राची, इतिहासाची माहिती झालेली होती. त्याला इंग्लंडच्या लोकशाही राज्यकारभाराचे वेस्टमिन्स्टर मॉडेल माहीत झालेले होते, त्याच्या डोळ्यासमोरचे ते लोकशाहीचे आदर्श प्रारूप होते. त्या आदर्शामध्ये एक गोष्ट या वर्गाला स्पष्ट दिसली की, इंग्लंडमध्ये लोक सरकार निवडतात, लोकच सरकार बनवतात, लोक सरकार पाडतातही, किंबहुना

सरकार कुठलाही राजा बनवत नाही. लोकांचे हक्क हळूहळू इंग्लंडमध्ये प्रस्थापित होऊन इंग्लंडच्या लोकशाहीत एक प्रौढत्व येत चाललेले दिसले. १८५७ च्या बंडाबद्दल या शिक्षित वर्गाचे मत बनले की इंग्रज गेल्यानंतर सर्व संस्थानिक किंवा राजे पुन्हा आपापली राज्ये स्वतंत्र करणार. त्यामुळे 'एक देश' नावाची संकल्पना इथे अस्तित्वात येणार नाही. म्हणून ते इंग्लंडच्या वेस्टमिन्स्टर मॉडेलकडे मोठ्या आकर्षणाने पाहत राहिले. लोकहितवादींनीही १८४८ मध्ये जी 'शतपत्रे' लिहिली त्यात पार्लमेंटचा उल्लेख आहे. एका शतपत्रामध्ये लोकहितवादींनी असे म्हटले आहे की, 'भारतीय लोक हळूहळू सगळी आधुनिक विद्या शिकून एके दिवशी इंग्लंडसारख्याच पार्लमेंटची मागणी करतील आणि इंग्रजांना आता तुम्ही गेलात गेला तरी चालेल असे म्हणतील'. म्हणजे इंग्रजी शिकलेल्या विचारवंतांना इंग्लंडच्या पार्लमेंटसारख्या लोकशाही संस्थांच्या कारभाराचा हळूहळू परिचय झाला. हळूहळू कसा झाला? कारण ब्रिटिशांनी येथील कौन्सिल, प्रांतिक विधीमंडळे, लोकल बोर्ड्स अशा संस्था निर्माण करताना प्रथमपासूनच सरसकट निवडून आलेल्या लोकांचा या संस्थांमध्ये समावेश केला नाही. आधी सरकारने नेमलेले सभासद, मग नंतर लोकांमधून एकेक दोनदोन प्रतिनिधी घ्यायचे, असे करत लोकांमधून निवडलेल्या सर्व सभासदांपर्यंत आपल्या लोकशाही राज्यकारभाराची वाटचाल स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी झालेली होती. केंद्रीय विधीमंडळात, प्रांतिक विधीमंडळात, जिल्हा लोकल बोर्ड, अशा वेगवेगळ्या ठिकाणी निवडून जाणारे प्रतिनिधी, त्यांच्या अखत्यारीत असणारे राज्यकारभाराचे विषय, हे सगळे जर आपण त्या काळाच्या इतिहासातून पाहिले तर लक्षात येते की, भारतीयांना लोकशाहीची सवय ब्रिटिश इथे आल्यापासूनच झालेली आहे. त्यामुळे भविष्यामध्ये हा देश लोकशाही मार्गाने जाणार ही गोष्ट १८५७ च्या उठावानंतर निर्णायकदृष्ट्या अधोरेखित झाली आणि १८८५ ला काँग्रेसच्या स्थापनेने त्यावर शिक्कामोर्तब केले.

त्यामुळे या देशाचा मूलाधार, जन्माधार एका बाजूला लोकशाही आहे तर दुसऱ्या बाजूला दुसरा मूलाधार हा धर्मनिरपेक्षतेचा आहे. आपली भारतीय म्हणून ओळख कधीपासून आहे? भारतीय ही आपली ओळख एकोणिसाव्या शतकात नव्हती, राष्ट्रीय जाणिवा निर्माण होण्यापूर्वी नव्हती. तेव्हा आपली ओळख मी एका प्रांताचा, एका धर्माचा, एका भाषेचा आणि मी एका जातीचा आहे, अशा आपल्या ओळखी होत्या. तुम्ही कुठले, असे म्हटले की, बंगाल सांगितले की, बंगाली भाषक आहे, मग तिथे ब्राह्मण आहात, की कायस्थ आहात, की आणखी कोणी आहात, की नामशूद्र आहात, हा दुसरा प्रश्न. आणि मग पुढे गोत्राबित्र हे सगळे माणसाच्या अधिकच्या ओळखीचे अनेक घटक. या भिन्न भिन्न ओळखी घेऊन राष्ट्र निर्माण होणार नाही; कारण यांच्यात बांधण्यासाठी एक सूत्र नाही. मग ते सूत्र कोणते? तत्कालीन राष्ट्रीय धुरीणांनी ठरवले की, आपण या तिन्ही चारी ओळखींच्या वरती असणारी एक नवीन ओळख निर्माण करायची. ती सर्वोच्च ओळख असेल. ती आहे, 'भारतीय' असणे, म्हणजे भारतीयत्व. या ओळखीमागील प्रथम मान्यता अशी की, भारत हे राष्ट्र आहे म्हणून आम्ही भारतीय आहोत. भारतीयत्व ही प्रांत, भाषा, धर्म, जात यांच्या वरची ओळख आहे, ती आपली प्रथम ओळख आहे. अमुक प्रांतिक, अमुक भाषक, अमुक धर्माचा, अमुक जातीचा या ओळखी भारतीयत्वाच्या नंतर येणाऱ्या आहेत. याअगोदर या चार ओळखी प्रधान होत्या. आता मुख्य ओळख झाली भारतीय आणि इतर ओळखी दुय्यम झाल्या. पुढचा प्रश्न, हे भारतीय कोण? कोणाला म्हणायचे भारतीय? तर आम्ही भारताचे नागरिक. एकोणिसाव्या शतकातल्या पत्रव्यवहारातून दिसते, आमचे सगळे नेते असे म्हणायचे की, आम्ही ब्रिटिश प्रजाजन आहोत. आज आपण 'सिटिझन', 'नागरिक' असा शब्द वापरतो. ब्रिटिश प्रजाजन म्हणजे ब्रिटिशांच्या साम्राज्याचे नागरिक. भारतीय या नव्या ओळखीने आता आम्ही ब्रिटिशांचे प्रजाजन नसून ब्रिटिश साम्राज्याचे भारतीय नागरिक आहोत, अशी झाली. यात आमच्या राष्ट्रवादाची झेप, भारतीयत्व हेच नागरिकत्व व्हावे, ब्रिटिश साम्राज्याने येथून काढता पाय घ्यावा, या प्रकारची होती. मग भारतीय म्हणविण्यास किंवा भारतीय नागरिकत्वास पात्र कोण? त्यावेळची मान्यता अशी की, भारत, पाकिस्तान, बांगलादेश हे जे तत्कालीन भारताच्या सरहद्दीत येणारे प्रदेश होते त्याअंतर्गत राहणारे, ते सर्व भारतीय. याचाच अर्थ भारतीय ही जी ओळख आहे ती धर्मनिरपेक्ष ओळख आहे; हा भारतीयत्वाचा दुसरा मूलाधार. हिंदू म्हणून तेवढाच

भारतीय, मात्र मुसलमान, ख्रिश्चन हे भारतीय नाहीत अशी आज सीएए खाली किंवा एनआरसी खाली, जी भूमिका घेतली जाते आहे ती भूमिका त्यावेळी नव्हती. त्यावेळची भूमिका सर्वसमावेशक नागरिकत्वाची, सर्वसमावेशक भारतीयत्वाची आणि सर्वसमावेशक भारतीय राष्ट्राची अशी विकसित होत आपण स्वातंत्र्याच्या दिशेने मार्गक्रमण करीत राहिलो.

या काळामध्ये चळवळींचे जे प्रवाह निर्माण झाले त्यांच्यामध्ये चार प्रवाह महत्त्वाचे आहेत. पहिला प्रवाह सामाजिक सुधारणावादाचा होता. फुले, आगरकर, रानडे, कर्वे किंवा दक्षिणेकडे पेरियार रामस्वामी नायकर वगैरे सगळी मंडळी सामाजिक सुधारणावादी होत. त्यांनी जातिभेद, धर्मभेद, प्रांतभेद गाडून, सतीच्या चालीसारख्या विपरीत धर्मश्रद्धा व रुढींच्या विरोधात महत्त्वाच्या सुधारणा होण्यासाठी, आपण एक राष्ट्र आहोत या भावनेने आंदोलने केली. स्वातंत्र्याला लायक होण्यासाठी व ते मिळवण्यासाठी सामाजिक सुधारणांच्या या पहिल्या प्रवाहाने काम केलेले आहे.

दुसरा प्रवाह आर्थिक राष्ट्रवादाचा. आर्थिक राष्ट्रवादाच्या प्रवाहातील प्रमुख नेते न्यायमूर्ती रानडे दाखवता येतात. रानडे ब्रिटिशांच्या कायद्याच्या राज्याचे प्रशंसक असले तरी त्यांच्या औद्योगिक धोरणांचे टीकाकार होते. ते म्हणत, आमच्याकडे भांडवल नाही, आम्ही मागास देश आहोत, आधीच मागासलेली आमची शेती इंग्रजांच्या काळात आणखीनच मागासलेली झाली. म्हणून रानड्यांनी ब्रिटिशांना इथले भांडवल, मनुष्यबळ वापरून औद्योगिकीकरण करण्याची मागणी केली. आर्थिक राष्ट्रवादाच्या प्रवाहांमधील दुसरे व्यक्तिमत्त्व ज्यांना आपण राष्ट्राचे पितामह म्हणतो ते दादाभाई नौरोजी. त्यांनी १८७६ मध्ये एक मोठा ग्रंथ लिहिला, "Unbritish Rule in India'. दादाभाई नौरोजींसारख्या अनेकांना माहीत होते की, ब्रिटीशांचे राज्य म्हणजे कायद्याचे राज्य, लोकांची इच्छा पूर्ण करणारे राज्य. पण कायद्याचे राज्य केवळ ब्रिटनमध्ये अस्तित्वात होते; इथे भारतात मात्र त्याविरोधी होते, म्हणून दादाभाईंनी त्याला 'अनब्रिटिश' म्हटले. दादाभाईंनी आपल्या ग्रंथात दाखवून दिले की, ब्रिटिश या देशातला कच्चा माल नेतात, पक्का माल इथे जास्त भावाने विकतात आणि नफा इथे न ठेवता ब्रिटनमध्ये नेतात, त्यावर त्यांचा देश चालतो, म्हणजे ब्रिटिशांच्या नोकरशाहीचे पगार व पेन्शन भारतीयच देतात. ब्रिटनचे औद्योगिकीकरणाचे चक्र भारताच्या भांडवलाच्या जोरावर चालते, याचा अर्थ ब्रिटिश आमची लूट करतात. दादाभाईंनी आपल्या ग्रंथात या लुटीचा जो हिशोब मांडला तो त्याकाळी २५ ते ३५ कोटी रुपयांच्या दरम्यानचा होता. रोमेशचंद्र इतिहासकार आणि अर्थतज्ज्ञ होते, त्यांनी सविस्तर पद्धतीने भारताच्या आर्थिक इतिहासाला न्याय दिलेला आहे. दादाभाईंनी असे सुद्धा मांडले की, ब्रिटिशांपेक्षा मोगल राज्यकर्ते बरे होते. मोगलांनी लूट केली, परंतु तो सगळा पैसा भारतातच विविध लोककल्याणाच्या गोष्टींसाठी वापरला, म्हणून मोगलांना आम्ही परकीय मानत नाहीत. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, मराठा साम्राज्याची सुद्धा 'आम्ही मोगलांना परके मानत नाहीत' अशीच भूमिका राहिली. त्यामुळे प्रसंगी मोगलांच्या साम्राज्याचे रक्षण मराठ्यांनी केलेले आहे. अशी राष्ट्रीयत्वाची जी जाणीव होती ती महाराष्ट्रातील मराठ्यांकडे होती. त्यामुळे एकूण देशाचा अर्थविचार, राज्यविचार, धर्मविचार यांच्यामध्ये बंगालच्या खालोखाल त्याकाळी महाराष्ट्राचा वरचष्मा होता, हेही लक्षात घेतले पाहिजे.

ब्रिटिशांनी असे आर्थिक नियोजन केले की, ज्यामुळे शेतीचा विध्वंस झाला, शेतसारा भरू शकणार नाही इतका शेतकरी कफल्लक झाला, सावकारशाही माजली, सावकारांच्या ताब्यात जमिनी जायला लागल्या, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये बंडाची स्थिती निर्माण झाली. दादाभाईंनी मांडलेला शोषणाचा मुद्दा नंतरच्या काळात स्वदेशीच्या भूमिकेचा पाया ठरला. त्यातूनच, 'आमचे शोषण आम्ही होऊ देणार नाही, आम्ही भारतात जे बनेल तेच वापरू, इथे जे पिकेल तेच खाऊ', ही स्वदेशीची भूमिका या शोषण विरोधातून जन्माला आली; जी पहिल्यांदा दादाभाई नौरोजींच्या लेखनातून स्पष्ट झाली. पुढे टिळकांच्या लेखनातून शोषणाचा मुद्दा प्रकर्षाने मांडला गेला. त्यानंतर गांधींचे लेखन आणि गांधींचे कार्यक्रम यामध्ये शोषणाविरूद्ध स्वदेशीचा मुद्दा, परदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशीच्या चळवळीपर्यंत गेलेला आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या प्रवाहामध्ये किंवा स्वातंत्र्य चळवळीच्या प्रवाहामध्ये शोषणाचा, स्वदेशीचा, बहिष्काराचा मुद्दा मध्यवर्ती बनला. यातून जो संघटनात्मक आविष्कार झाला तो आपल्याला १९४२

**(पृष्ठक्रमांक ११ वर)**




# आगरकर : देव न मानणारा देवमाणूस

**जगदीश काबरे ।** सांगली
९९२०१९७६८०

'भीतीपोटी देव, देवापोटी श्रद्धा
श्रद्धेपोटी अंधश्रद्धा, अंधश्रद्धेपोटी बुवाबाजी
बुवाबाजीपोटी योग, योगाआडून भोग.
कसा थांबेल हा रोग?
देवच नाकारला तर...???'

'आम्ही, देव ही माणसांनी भीतीपोटी निर्माण केलेली काल्पनिक रचना आहे असे मानतो. तेव्हा त्याचा आधार घेऊन जिथे जिथे शोषण, कुप्रथा आणि अंधश्रद्धा व कर्मकांड केले जाते, त्याच्या विरोधात आमचा लढा आहे', असे विचार गोपाळ गणेश आगरकर आपल्या 'सुधारक' पत्रातून सातत्याने निर्भीडपणे मांडत असत. ते आपले विचार एवढ्या जहाल शब्दात मांडत की, तसे आजच्या पुरोगाम्यांनाही मांडताना दहावेळा विचार करावा लागतो. आगरकर लेखसंग्रह (इ.स.१८८५ ते १८९५) मधील एका लेखात परंपरावाद्यांचा समाचार घेताना ते म्हणतात, ''पृथ्वी सूर्याभोवती फिरते, सूर्य पृथ्वीभोवती फिरत नाही ही गोष्ट कोपर्निकस व गॅलिलिओ यांनी जगाच्या नजरेस आणून दिल्यास पक्की सव्वादोनशे वर्षे होऊन गेली, तरी आमच्या पारंपरिक लोकांच्या मते सूर्य व चंद्र हे एकाच प्रकारचे ग्रह असून ते पृथ्वीभोवती घिरट्या घालीत आहेत, आमच्या पंचांगात प्रत्येक पानावर चमकणारे, पण शास्त्रज्ञांना मोठमोठे दूरदर्शकयंत्र लावूनही न गवसलेले राहू व केतू द्विजांस विकल करीत आहेत. शनी वगैरे ग्रहांचा आपल्याशी अर्थाअर्थी संबंध नसूनही त्यांची साडेसाती आम्हास अद्यापि छळीत आहे. तात्पर्य, रूढ आचार किंवा विचार खरा असो किंवा खोटा असो, त्याचे जीवित पराकाष्ठेचे चिकट असते. शेकडो वर्षे त्याच्या टाळक्यात आणि पेकाटात सोटे घालावे लागतात तेव्हा कोठे तो आपला पाय काढता घेतो.''



आगरकरांनी केसरीच्या संपादनाची जबाबदारी स्वीकारून असेच परिणामकारक लेखन करून आणि कुशल संपादनाच्या जोरावर अल्पावधीतच केसरीला लोकप्रियता प्राप्त करून दिली. न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी स्थापन केलेल्या 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'च्या फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य (१८९२) म्हणूनही त्यांनी अखेरपर्यंत काम केले. महाविद्यालयीन जीवनातच जेरेमी बेंथम, जॉन स्टुअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित झाल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन उदारमतवादी, बुद्धिप्रामाण्यवादी आणि अज्ञेयवादी झालेला होता. याच दृष्टिकोनातून तत्कालीन समाजाची स्थितिशील अवस्था त्यांना जाचत होती व समाजजागृती करण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. केसरीतील त्यांच्या सामाजिक लेखांतून हीच भूमिका व्यक्त होऊ लागली. सामाजिक प्रश्नांच्या जाणिवेपेक्षा राजकीय प्रश्नांची जाणीव अधिक तीव्र असली पाहिजे, असे केसरी व मराठाच्या चालक मंडळींचे धोरण होते, तर सामाजिक सुधारणांना प्रथम प्राधान्य देऊन सामाजिक सुधारणा वेगाने घडाव्यात असे आगरकरांचे धोरण असल्यामुळे, आगरकरांचा वैचारिक कोंडमारा होऊ लागला. परिणामतः

ते केसरीतून बाहेर पडले (१८८७) आणि आपल्या क्रांतिकारक सामाजिक विचारांच्या प्रतिपादन-प्रसारासाठी १८८८ साली 'सुधारक' हे पत्र त्यांनी काढले. त्यात राजकीय व अर्थशास्त्रविषयक लेखही येत.

बुद्धिवादी दृष्टिकोनातून समाजजीवनाचे विश्लेषण करून अन्याय रूढी आणि परंपरा यांच्यावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले. बुद्धीच्या निकषांखेरीज अन्य कोणताही निकष ते मानीत नसल्यामुळे समाजसुधारणांचे समर्थन करण्यासाठी स्मृतिवचनांचा आधार घेणे त्यांना मान्य नव्हते. नीतिमान आणि सदाचरणी समाजाच्या निर्मितीसाठी ईश्वर आणि धर्म यांचीही आवश्यकता त्यांना

वाटत नव्हती. परोपकारादी सद्गुण धर्माच्या आधी अस्तित्वात आले असून नंतर धर्मात ते गोवले गेले, अशी त्यांची भूमिका होती. बुद्धिवाद, व्यक्तिवाद, समता, स्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टी, इहवाद आणि मानवतावाद या सप्तसूत्रीने आगरकरांचा सारा सामाजिक विचार व्यापलेला आहे. साहजिकच पूर्वजन्म आणि पुनर्जन्म यांसारख्या कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता आणि चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह, ठरवून केलेले विवाह इ. गोष्टी त्यांना सर्वथैव अमान्य होत्या. मुला-मुलींस समान शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम व व्यवसायाभिमुख शिक्षण द्यावे, दुष्ट आचारांचे निर्मूलन करावे, सदाचाराचा प्रसार करावा, ज्ञानवृद्धी करावी, सत्यसंशोधन करावे, भूतदया राखावी यासाठी ते प्रयत्नशील होते. मनुष्यजातीचे ऐहिक सुखवर्धन हेच त्यांचे ध्येय बनले होते. तथापि, निव्वळ इंद्रियसुखालाच ऐहिक सुख मानण्याइतपत त्यांची दृष्टी संकुचित नव्हती. नीतिमान आणि संयमी जीवनामुळे मनाला लाभणारे समाधानही या ऐहिक सुखात त्यांना अभिप्रेत होते. व्यक्तिस्वातंत्र्यामुळे स्वार्थ आणि स्वैराचार फैलावण्याऐवजी समाजातील व्यक्ती परोपकारी आणि परहितचिंतकच होतील, असे त्यांना वाटे. उलट व्यक्तिस्वातंत्र्य न मानणाऱ्या व निरुपयोगी परंपरांनी वेढलेल्या समाजाची केव्हाही प्रगती होऊ शकणार नाही, अशी त्यांची ठाम धारणा होती. परंपरांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन ऐतिहासिक होता; त्यामुळे एखादी गोष्ट समाजाच्या एका अवस्थेत उपयुक्त ठरली असेल, हे ते मान्य करीत; मात्र तीच गोष्ट बदलत्या काळात जाचक ठरल्यास बिनदिक्कतपणे टाकून द्यावी, असे ते म्हणत. अशा रूढी आणि परंपरा स्वखुषीने सोडून द्यावयास समाज तयार नसेल, तर त्या सरकारी मदतीने कायदेशीररीत्या नाहीशा कराव्यात, असे त्यांचे मत होते. केवळ धर्मच नव्हे, तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सारासार विचार करून आंधळेपणाने गतानुगतिक वर्तन नाकारून जाणीवपूर्वक योग्य त्या मार्गाची निवड करण्याचा पुरस्कार करणारे आगरकर बुद्धिवादी संत किंवा 'देव न मानणारे देवमाणूस' मानले जातात.

'देवाची कल्पना माणसाचीच' असे आगरकर म्हणतात. ''आकाशातून देव येथे कधी आले नाहीत, येथून परत कधी गेले नाहीत. आम्हीच त्यांना येथल्या येथे निर्माण करतो, त्यांच्या गुणांचे पोवाडे गातो आणि चाहील (वाटेल) तेव्हा त्यांस नाहीसे करतो.'' असे त्यांनी ह्या संदर्भात नमूद केले आहे. त्यामुळे धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अमानुष, अघोरी, जुलमी प्रकारांना त्यांनी कड़ाडून विरोध केला. कोणाला सोवळेओवळे हे निरुपद्रवी प्रकार वाटतात. परंतु त्याविषयी देखील आगरकर ताशेरे ओढतात, सोवळ्याओवळ्याचा बडेजाव करणे म्हणजे व्यवहारात नसत्या अडचणी उपस्थित करणे आणि वर्गावर्गात सलोखा न होण्यासारखी अट घालून ठेवण्यासारखे होय. मात्र स्वभूमीत, स्वलोकात, स्वधर्मात आणि स्वाचारात राहून अविचारी आणि अज्ञानी देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडीगोडी लावून अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. म्हणून 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल तेच करणार' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते.

पण सुधारकांना कोणत्याही धर्मात नाकारलेच जाते; तरीही भविष्यात त्यांच्याच विचारांचा विजय होतो. जसे आगरकरांची त्या काळी प्रतीकात्मक जिवंत प्रेतयात्रा काढून सनातन्यांनी निषेध नोंदवला, पण त्यांनी तेव्हा सांगितलेल्या सुधारणा समाजाने आज स्वीकारल्या आहेत. समाज स्थितिशील असल्यामुळेच सुधारकांना विरोध पत्करूनही भविष्यातील सकारात्मक बदलांसाठी कार्य करावे लागते. सुधारकांना सनातनी नाकारतात, कारण त्यांचे हितसंबंध त्या सुधारणांमुळे धोक्यात येणार असतात. खरे तर त्यांचा हा कावा सामान्य जनांनी लक्षात घेऊन पाद्री, भट-पुरोहित आणि मुल्ला-मौलवीपासून चार हात दूरच राहायला हवे.

धारदार शब्द हे आक्रमक वाटतात म्हणून आगरकरांनी विचार केला असता तर आजही १०० वर्षांपूर्वीच्या अनिष्ट परंपरांच्या, मागासलेपणाच्या गर्तेत इथला समाज लोळत पडला असता. पण त्यांच्यामुळेच आजचा महाराष्ट्र बदललेला दिसतोय. अनिष्ट मोडणे म्हणजेच धर्मसुधारणा करणे असते. कारण धर्माच्या आधारेच ह्या परंपरा निर्माण केलेल्या असतात. समाजसुधारणेसाठी प्रवाहाच्या विरुद्ध पोहणे आवश्यक असते, पण प्रवाहपतितांच्या आकलनापलीकडचे हे धाडस असते. म्हणून प्रवाहपतित लोक समूह करून कळपात सुरक्षितता शोधण्याचा सतत प्रयत्न करत असतात. त्यामुळे कुणी कळपाबाहेरचा विचार करू लागला की, त्याला मारून मुटकून कळपाच्या नियमांचा

धाक दाखवला जातो आणि कळपात फिट्ट बसवण्याचा प्रयत्न केला जातो. समाजसुधारक हे कळपाच्या विचारांपेक्षा वेगळा विचार करणारे असतात, तेव्हा ते अशा धमक्यांना घाबरत नाहीत. कारण कळपातील काही विचारी माणसांना आणि कुंपणावरच्या लोकांना समाजसुधारकांचा विचार पटत असतो, पण बदलण्याचे धाडस त्यांच्या अंगी आलेले नसते. म्हणून सुधारकांनी सतत विचारांची बीजे पेरत राहिले पाहिजे, म्हणजे अशा परिघावरच्या लोकांना बदल करण्यास धाडस एकवटता येते. आज जरी कळपातील प्रवाहपतित लोक सुधारकांना तुच्छ लेखत असले तरी भविष्यातील चांगल्या बदलांकडे पाहून समाजसुधारक प्रवाहपतितांच्या शिव्यांनाही ओव्या समजून आपले कार्य करत राहतात आणि ते कार्य करताना प्रवाहपतितांकडे करुणेने पाहत असतात.

आज आवश्यकता आहे ती सामाजिक समतेची. कारण त्यातूनच सामाजिक एकता व राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल. समाजाला ही दिशा सुधारकांनी मिळवून दिलेली आहे. आज भारताबाहेर किती व कसे बदललेले जग आहे, ते जग व ती परिस्थिती सुधारकांना व बुद्धिवाद्यांना दिसलेली आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतभर ब्रिटिशांचे राज्य स्थिरस्थावर होऊ लागले. इंग्रजांनी इंग्रजी भाषा व आधुनिक शिक्षणपद्धती आणली आणि सर्व शिक्षण सर्व जातिवर्णांना खुले ठेवले. काही थोडे भारतीय समुद्र पर्यटनाची बंदी (धर्माने घातलेली) झुगारून समुद्रापलीकडे जाऊ लागले. त्यामुळे भारताबाहेरही काही जग आहे अशी जाणीव भारतीयांना नव्याने प्रथमच होऊ लागली. फ्रेंच राज्यक्रांतीने निर्मिलेल्या व नंतर जगभर पसरलेल्या 'स्वातंत्र्य, समता व बंधुता' या मूल्यांचे महत्त्व भारतीय नवशिक्षितांना पटू लागले. इकडे भारतभर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी, हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, अस्पृश्यता व जन्मजात उच्च-नीचता वगैरे अनेक दोषांवर बोट ठेवून जोरदार प्रहार, प्रचार केला. अशा अनेक कारणांनी भारतातील बुद्धिमंत 'आत्मपरीक्षण' करू लागले. त्यामुळे 'देवभक्तीभोवती फिरणाऱ्या संतांच्या स्थितिप्रिय शिकवणुकीचा प्रभाव' कमी होऊ लागून एकोणिसाव्या शतकाने भारताला विशेषत: महाराष्ट्राला मोठे 'संत' देण्याऐवजी मोठे 'समाजसुधारक' दिले. त्यात महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, प्रबोधनकार ठाकरे अशी कितीतरी नावे आहेत की ज्यांनी भारतीयांच्या आचारविचारांना पुरोगामी दिशा देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. त्यामुळे १०० वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र आज पूर्णपणे बदललेला दिसतोय. म्हणून प्रवाहपतितांनी जरी सुधारकांच्या कृतिशीलतेकडे दुर्लक्ष केले तरी सुधारक आपले विचार पेरायचे व्रत सोडत नाहीत. हाच ऐतिहासिक सुधारकांनी आजच्या सुधारकांना दिलेला कानमंत्र आहे.

●

---

**(पृष्ठक्रमांक ८ वरून)**

च्या 'छोडो भारत' या आंदोलनातून दिसतो. यातून निर्माण झालेला राजकीय राष्ट्रवादाचा तिसरा प्रवाह होता, त्यानेच भारतीय स्वातंत्र्यलढ्याला गती दिली. सामाजिक सुधारणांचा प्रवाह हा महत्त्वाचा होताच, उद्याचा स्वतंत्र भारताचा समाज कसा असावा याचे ते चित्र होते. परंतु त्याने राष्ट्रीय चळवळीला गती मिळाली नाही. कारण सामाजिक सुधारणा म्हटल्या की समाजामध्ये मतभिन्नता आली, मतभिन्नता आली की एकजूट संपली, एकजूट संपली की चळवळीचे बळ संपले, आणि ब्रिटिश ही एकजूट संपवण्यासाठी टपूनच बसले होते.

चौथा प्रवाह हा क्रांतिकारक राष्ट्रवादाचा होता. हे राज्य सनदशीर पद्धतीने निर्माण झालेले नाही, हे राज्य आपले नाही, काहींना हे राज्य धर्म बुडवणारे वाटले, काहींना हे राज्य गरिबांचे आणि शेतकऱ्यांचे शोषण करणारे वाटले, अशा सगळ्यांनी ब्रिटिश राजवट उलथून टाकण्यासाठी आपापल्या परीने क्रांतिकारक मार्गांचा अवलंब केला. त्यात भगतसिंग आणि गदर पार्टीचा इतिहास आपल्याला ठाऊक आहेच. क्रांतिकारकांनी इंग्रजांवर हल्ले केले, त्यात काही अधिकारी मारले गेले, पोलीस मारले गेले. १८५७ च्या बंडामध्ये काही इंग्रज मारले गेले होते. क्रांतिकारकांच्या या प्रवाहाची मर्यादा ही होती की, तो मध्यवर्ती प्रवाह होऊ शकत नव्हता. मागासलेल्या आणि प्रचंड गरिबी, निरक्षरता, अज्ञान असलेल्या, इतके दारिद्र्य असलेल्या देशात प्रत्येकाच्या हाती शस्त्र देणे शक्य नाही आणि इंग्रज ते देऊ देणार नाहीत. त्याच्यामुळे इथे दुसरा कुठलातरी मार्ग शोधायला पाहिजे होता.

(उत्तरार्ध पुढील अंकात)

**शब्दांकन : प्रल्हाद मिस्त्री/राजेंद्र फेगडे**

●

# सावित्रीबाई : पहिली बंडखोर समाजसुधारक



**अरुणा दिवेगावकर** । लातूर
७६६६५०९१७४

भारतातील स्त्री-समाजात अंधश्रद्धा अधिक प्रमाणात आढळतात, याचे एक महत्त्वाचे कारण हे की, प्राचीन काळापासून स्त्री ही शिक्षणापासून वंचित होती. सगळीकडे अंधश्रद्धेच्या जास्तीत जास्त बळी स्त्रियाच असल्यामुळे आणि त्या अंधश्रद्धेच्या वाहकही असल्यामुळे 'स्त्रिया आणि अंधश्रद्धा' हा विषय महत्त्वाचा आहे. सर्वसामान्यपणे असे दिसते की, शोषणाचे बळी असलेल्यांना शोषणाबद्दल एक प्रकारचा राग असतो. परंतु महिला वर्गात मात्र याच्या उलट चित्र पाहायला मिळते. ज्या अंधश्रद्धांच्या, ज्या शोषणाच्या त्या बळी असतात; त्या अंधश्रद्धा महिला अतिशय सन्मानाने, अभिमानाने मिरवत असतात. स्त्रियांत अंधश्रद्धा जोपासल्या जात आहेत, याचे दुसरे एक महत्त्वाचे कारण हे की, स्त्रीवर दैववादाचा पगडा फार मोठ्या प्रमाणावर आहे.



'ढोल, गँवार, शूद्र, पशू और नारी
ये सकल ताडन के अधिकारी'

अडाणी माणूस, शूद्र व्यक्ती, पशू आणि स्त्री या सगळ्यांना जसा ढोल सतत पिटला जातो त्याप्रमाणे यांना (शस्त्रांनी, शब्दांनी अथवा कोणत्याही प्रकारे) मारीत राहावे, याच पात्रतेचे ते असतात; म्हणून त्यांना मारीत राहण्यात धार्मिकदृष्ट्या काहीही चूक नाही. अशा स्वरूपाची धार्मिक ग्रंथातील एक स्पष्ट नोंद आढळते. ही मांडणी जर आपण बघितली, तर स्त्रीला अंधश्रद्धेमध्ये ढकलून तिला जे गौणत्व दिले जाते त्याची सुरुवात धर्मापासूनच कशी होते हे आपल्याला समजू शकेल. भारतीय स्त्रियांतील या अंधश्रद्धा, हा दैववाद दूर करण्यासाठी पहिला लढा दिला तो सुद्धा एका स्त्रीनेच! क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनीच!! आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेने, निर्भीड व्यक्तिमत्त्वाने, सामाजिक समस्यांच्या चिंतनातून, जोतिराव फुले यांच्या खांद्याला खांदा लावून समाजपरिवर्तनासाठी त्यांनी संघर्ष केला. एकोणविसाव्या शतकातील मनुवादी अंधारयुगात सावित्रीबाई फुलेंनी एक लखलखती ज्वाला बनून निरक्षरता, अंधश्रद्धा, धार्मिक पाखंड, जातपितृसत्ताकत्व, वर्णद्वेष याविरुद्ध बंड केले.

सावित्रीबाई फुले एकोणीसाव्या शतकातील अंधारयुगात एक आशेचा किरण ठरल्या. त्यांनी भारतीय समाजातील अंधश्रद्धा, दांभिकता, ढोंग, धार्मिक पाखंडही मोडून काढले आणि दीन, दलित आणि स्त्रियांसाठी ज्ञानाचे दरवाजे खुले केले. समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले तत्कालीन खडतर परिस्थितीत बंडखोर नायिका म्हणून उदयास आल्या. भारतीय स्त्रीचळवळ समजून घ्यायची असेल तर सावित्रीबाई फुले यांचे जीवन समजून घेतले पाहिजे. तत्कालीन समाज समोर ठेवून त्यांच्या कार्याला न्याय दिला पाहिजे. सावित्रीबाई फुले यांचा जन्म दीन समाजात, माळी जातीत झाला. वयाच्या नवव्या वर्षी लग्न झाले. लग्नानंतर जोतीरावांची साथ असल्यामुळे त्यांनी घर सांभाळून, समाजाचा विरोध पत्करूनही शिक्षण घेतले. त्या भारतातील पहिल्या प्रशिक्षित शिक्षिका ठरल्या. धर्मशास्त्रानुसार महिलांसाठी शिक्षणाची सर्व दारे जवळपास बंद असताना त्यांनी शिक्षणावर काम सुरू केले. मुलींसाठी शाळा काढल्या. त्या काळी स्त्रियांना पायाची वहाण, नरकाचे दार म्हटले जायचे. चूल आणि मूल हेच तिचे विश्व होते, पतीची सेवा करणे हाच तिचा परम धर्म होता. तिच्या इच्छेला आवडीनिवडीला आणि मताला-मनाला काहीच किंमत नव्हती. स्त्री गुलामगिरीचा पहिला पुरस्कर्ता वैदिक काळातील कालपुरुष मनू, ज्यास देवाचा प्रेषित मानून त्याने रचलेल्या मनुस्मृतीचा आधार घेऊन स्त्रियांचे अस्तित्वच नाकारले गेले होते. स्त्री ही एक माणूस आहे,

तिला मन आहे, भावना आहेत, आत्मसन्मान आहे, एक स्वतंत्र अस्तित्व आहे याचे भान त्या काळच्या समाजाला नव्हते.

विधवा स्त्रियांची स्थिती तर अतिशय अनुकंपनीय होती. अकाली वैधव्य आलेल्या तरुण विधवा केशवपन करून विद्रूप होऊन अंधाऱ्या कोपऱ्यात जीवन जगत होत्या. समाजात बालविधवांचे प्रमाण खूप जास्त होते. याचे कारण त्यावेळी असलेली बालविवाह प्रथा होय. याचे मुख्य कारण गरिबी, अज्ञान आणि रूढी परंपरा हेच होते. सहा-सात वर्षाच्या मुलीचा विवाह साठ-सत्तर वर्षाच्या म्हाताऱ्याशी लावून देताना कोणालाच गैर वाटत नव्हते. स्त्रिया आपले स्वत्व गमावून बसल्या होत्या. आपण आश्रित आहोत, परावलंबी आहोत, केवळ पुरुषसुखाचे साधन आहोत असे स्त्रिया मानीत होत्या आणि ही देवाधर्माचीच आज्ञा आहे, असा ग्रह करून जगत होत्या. स्त्रियांना या गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी सावित्रीबाईंना एकच मार्ग दिसत होता तो म्हणजे शिक्षण! त्यांच्या मते, शूद्रांच्या चेतना जागृत करण्यासाठी शिक्षणातून ज्ञान मिळवणे, ज्ञानाद्वारे मानवता जागवणे आणि पशुवाद संपवणे हाच उत्तम मार्ग आहे. शिक्षिका झाल्यानंतर त्यांना समाजातून तीव्र विरोध झाला. त्या धर्म बुडवताहेत म्हणून त्यांना अश्लील शिवीगाळ करून, दगड, शेण मारून त्रास दिला. परंतु सावित्रीबाई फुले जोतीरावांच्या खांद्याला खांदा लावून अध्यापनाचे कार्य करीतच राहिल्या. तेव्हा त्यांच्या सासऱ्यांवर दबाव आणला गेला की, जोतीराव आणि सावित्रीबाई अस्पृश्यांना शिकवण्याचे धर्मशास्त्रविरोधी काम करीत आहेत, ते त्यांनी थांबवले नाही तर त्यांना घराबाहेर काढा. त्या दबावाला बळी पडून सासऱ्यांनी त्यांना घराबाहेर काढले पण त्या डगमगल्या नाहीत.

सावित्रीबाईंच्या शैक्षणिक कार्याचा विचार करता त्यांची अभ्यासदृष्टी किती व्यापक होती हे लक्षात येते. प्रौढशिक्षण, रात्रशाळा, साक्षरता अभियान, खाऊ वाटप यासारखे उपक्रम त्यांनी त्याकाळी राबवले होते; यावरून त्यांचे विचार काळाच्या किती पुढे होते हे लक्षात येते. शिक्षणासोबतच महिलांची स्थिती सुधारण्यासाठी महिलांनी संघटित व्हावे, असे सावित्रीबाईंना वाटत होते. त्यांनी महिलांना संघटित करण्यासाठी तिळगुळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले; तेही डोळसपणे. त्या कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिकाच याची साक्ष देते. त्या पत्रिकेत लिहिले होते की, कोणत्याही जातीच्या अथवा धर्माच्या बायका असल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. जातिभेद व पक्षपात न करता सर्वांना सारखेच धरून हळद, कुंकू लावण्यात येईल. यावरून सावित्रीबाईंच्या जातिभेद निर्मूलनाची व पुरोगामित्वाची कल्पना येते. क्रांती म्हणजे आमूलाग्र व्यवस्था परिवर्तन; मग ते धार्मिक, राजकीय अथवा सामाजिक इत्यादी कोणत्याही क्षेत्रातील असो. तत्कालीन समाज तर व्रतवैकल्य, कुळाचार, अनिष्ट चालीरीती, जातिभेद यामध्ये गुरफटलेला होता. अशा वातावरणात अशा प्रकारचा समारंभ करणे खचितच धैर्याचे काम होते. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, सावित्रीबाईंनी हळदीकुंकवाच्या कार्यक्रमातून समाजजागृतीचे काम केले होते. हा कार्यक्रम आजकालच्या महिला मंडळांसारखा स्वतःच्याच जाति-वर्गापुरते समारंभ करून आपापल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करणे यासारखा नक्कीच नव्हता. बालविवाह, बाल-जरठ विवाह, विधवा केशवपन यासारख्या अनिष्ट प्रथांविरुद्ध सावित्रीबाईंनी वेगवेगळे कृतिकार्यक्रम करून या अमानुष प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न केले. केशवपनाविरुद्ध न्हाव्यांचा संप घडवून आणला. विधवा आत्महत्या आणि भ्रूणहत्या टाळण्यासाठी सगळ्या समाजाचा रोष पत्करून आपल्या राहात्या घरीच 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची उभारणी केली. विधवा पुनर्विवाह घडवून आणले.

ज्या काळात स्त्रीने शिक्षण घेणे म्हणजे महाभयंकर पाप समजले जाई त्या काळी स्वतः शिक्षण घेऊन इतरांना शिक्षण देणारी, बालहत्या प्रतिबंधक चळवळ, विधवा केशवपनविरोध चळवळ, विधवा पुनर्विवाह प्रसार यासारख्या चळवळी करणारी, प्रसंगी गुंडांच्या कानशिलावर बोटे उमटवणारी धैर्यवान-बंडखोर स्त्री म्हणून सावित्रीबाई पुण्यात प्रसिद्ध झाल्या होत्या. भारताच्या इतिहासामध्ये एखाद्या महिलेने मृत्यूसंस्कार केल्याची पहिलीच घटना घडली असावी. जोतीरावांच्या मृत्यूवेळी वारसा, परंपरेचा आधार घेऊन त्यांच्या दत्तक मुलाला अग्निसंस्कार करण्यापासून रोखले गेले; तेव्हा, माझा मुलगा दत्तक म्हणून त्याला तुम्ही अग्निसंस्कार करू देणार नसाल तर, ज्यांनी जिवंतपणी शेटजींच्या प्रत्येक गोष्टीला विरोधच केला त्यांना देखील मी पार्थिवाला हात लावू देणार नाही. आणि असे म्हणून सावित्रीबाईंनी स्वतः टिटवे हाती धरले आणि चित्तेला अग्नीदेखील दिला. किती

मोठे धैर्य असेल त्या माऊलीच्या अंगी! शिक्षणातून त्यांना आत्मविश्वास आणि रुढी-परंपरांना झुगारून देण्याचे धैर्य मिळाले होते हेच यावरून स्पष्ट होते. सावित्रीबाई फुले यांनी समाजाच्या अंतर्मनाला छेद दिला. त्यांना पितृसत्ताक समाजरचनेचे मूळस्त्रोत ब्राह्मणवादात म्हणजेच जातीयवादात दिसले. धर्मग्रंथांना महत्त्व देऊन समाजात अन्याय, शोषण, अंधश्रद्धा, विषमता कायम ठेवण्याचे षडयंत्र पुरोहित आणि ब्राह्मण रचतात. त्याचा परिणाम शूद्र आणि विशेषतः स्त्रियांवर अन्यायकारक, अत्याचार आणि शोषण करण्यात होतो. सावित्रीबाईंनी शिक्षण आणि समाजरचनेत बदल हाच यांच्याविरुद्ध लढण्याचा उपाय मानला. आज नोकरी-व्यवसायात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी सुशिक्षित स्त्री म्हणजे शंभर-दीडशे वर्षांपूर्वी सावित्रीबाईंनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे फलित होय. प्रतिगाम्यांचा प्रखर विरोध सहन करून जाती, वंश, धर्म व परंपरा यांच्या कक्षा ओलांडून विचारनिष्ठा आणि विज्ञाननिष्ठा बाळगणाऱ्या स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या आद्यप्रवर्तक म्हणून आपण सावित्रीबाईंकडे नक्कीच आदराने बघतो. परंतु त्यांना आयुष्यभर फक्त आणि फक्त संघर्षच करावा लागला. युगप्रवर्तक स्वरूपाची क्रांती करणाऱ्या महात्म्यांचे जीवन हे साधे सरळ कधीच नसते. एकंदरीत समाजजीवनाच्या व स्थलकालाच्या विरुद्ध दिशेने प्रवाह पोहत जाणे सोपी गोष्ट नसते. त्यासाठी प्रचंड आत्मविश्वास, समर्पणभाव, परिवर्तनाची आकांक्षा व मानवी कल्याणाची भावना हृदयात सतत तेवत असावी लागते. म्हणूनच त्या खऱ्या अर्थाने आधुनिक 'भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या' प्रणेत्या आहेत.

आजही देशात महिलांच्या हक्कांचा प्रश्न येतो, तेव्हा स्त्रीच्या जीवनाच्या स्थितीच्या तुलनेत स्त्रीशिक्षणाचा मुद्दा आपोआप दुसऱ्या क्रमांकावर येतो. स्त्रीभ्रूणहत्या कशी थांबवायची, मुलगी जन्माला आली तर तिला कसे वाचवायचे, तिला पूर्ण लसीकरण आणि पुरेसे पोषण कसे मिळवून द्यायचे जेणेकरून तिला कुपोषणामुळे आपला जीव गमवावा लागणार नाही, ही आमची पहिली चिंता आहे. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्याशिवाय किंवा त्या निर्णयप्रक्रियेत सहभागी झाल्याशिवाय महिला समानता किंवा महिला सक्षमीकरणाची मोहीम पूर्ण होऊ शकत नाही, असे अनेक अभ्यासांतून सांगण्यात आले आहे. परंतु हे तेव्हाच होईल जेव्हा स्त्री सुशिक्षित होईल. केवळ साक्षरतेने काम होणार नाही. महिला समानतेच्या घोषणा आणि मोहिमा हे दबावगट म्हणून काम करतात आणि या दबावाखाली महिलांची उपस्थिती दिसून येते. पण ही उपस्थितीही वरवरची असते. अनेक मंचांवर, विशेषत: महत्त्वाच्या ठिकाणी, महिला प्रतिनिधी केवळ मूकसंमतीसाठीच उपस्थित असल्याचे दिसते. त्या कोरम पूर्ण करतात. परंतु त्यांच्या मतभेदाला आणि मताला सहसा जागा नसते. अशा स्थितीत सावित्रीबाई फुले यांचे स्मरण करताना कपाळावर आडवी चिरी लावून काठपदराची साडी नेसून आपला फोटो सोशल मीडियावर टाकण्याचे कर्मकांड न करता त्यांच्या स्त्रीशिक्षणाच्या स्वप्नांची आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या ध्येयांची आठवण ठेवून त्यानुसार कृती करण्याचा संकल्प करून त्यांचे स्मरण करावे असे वाटते.

•

**अभिवादन**




अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे संपादक मंडळ सदस्य प्रा. डॉ. मांतेश हिरेमठ यांच्या मातोश्री **बसव्वा मळय्या हिरेमठ** (वय वर्ष ७५) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांना महा. अंनिसच्या वतीने भावपूर्ण आदरांजली.

## विचारशलाखा

आपली संघटना आता महाराष्ट्रात विस्तारली आहे. प्रत्येक जिल्ह्यात कार्यकर्ते आहेत. आपण एका मोठ्या संघटनेचा भाग आहोत, याची थेट प्रचिती त्यांना यावी कशी? त्यासाठी कल्पना अशी की, दूरच्या जिल्ह्यातील एका कार्यकर्त्यांशी आपण दर महिन्यातून एकदा छानसे पत्र लिहून संपर्क करायचा. घरातील, चळवळीतील बाबी अनौपचारिकपणे त्यांना लिहावयाच्या. वर्षभर हा वसा सांभाळायचा. प्रेम एकतर्फी झाले तरी वसा सोडायचा नाही.

**- डॉ. नरेंद्र दाभोलकर**



# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य

**प्रा. संध्या राजुरकर** । नागपूर
९४२२८६०६४८

दीडशे वर्षांपूर्वीच्या महाराष्ट्रात अस्पृश्यांचे हाल बघून जोतिबांचं काळीज पिळवटून निघत असे. जोतिबांनासुद्धा मित्रपरिवारामध्ये स्पृश्यास्पृश्यतेचा सामना करावा लागला. तत्कालीन अमानुष रूढी-परंपरा व कर्मकांड याविरुद्ध जोतिबांचे मन पेटून उठले. त्यांच्या मनातील पेटत्या ज्योतीला प्रज्वलित करण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले व खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत बनल्या. सावित्रीबाई फुले या एका ज्योतीने हजारो ज्योती पिढ्यान्‌पिढ्यांचा अंधार मिटवण्यासाठी प्रज्वलित केल्या. महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा चळवळीतील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणून सावित्रीबाई फुले ओळखल्या जातात. जात आणि लिंगावर आधारित भेदभाव आणि अन्यायकारक वागणूक नाहीशी करण्यासाठी त्यांनी काम केले. त्यांनी विधवांचे होणारे केशवपन थांबवण्यासाठी पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता.



**नवसमाजनिर्मितीसाठी अंधश्रद्धा-निर्मूलन :**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी प्रतिष्ठा, सामाजिक व आर्थिक न्याय, आणि शोषणरहितता या मूल्यांवर आधारित नवी समाजव्यवस्था जर निर्माण करायची तर जुन्या, विषम व शोषणप्रधान समाजव्यवस्थेला तिच्या पायाभूत मूल्यांसह उखडून टाकलेच पाहिजे, अशी जोतीरावांची ठाम धारणा होती. पाया तसाच ठेवून वरच्या डोलाऱ्यात थातूरमातूर दुरुस्त्या करून नवसमाजनिर्मिती होणे शक्य आहे अशा मतांच्या इतर सुधारकांशी ते मुळीच सहमत नव्हते. सामाजिक उच्चनीचता ईश्वरी संकेतानुसार किंवा पूर्वजन्मीच्या संचिताबरहुकूम असते, त्यामुळे तिचे निराकरण करण्याचा कोणताही प्रयत्न महत्पाप ठरतो हा विचार जोपर्यंत शोषित, वंचितांच्या मनीमानसी घट्ट रुतून बसलेला राहील, तोपर्यंत त्यांना समाजजीवनाचे नवे संकेत समजावून सांगणे केवळ अशक्य आहे, हे ओळखून सावित्रीबाईंनी त्या अंधश्रद्धांवर कठोर प्रहार केले. ग्रंथप्रामाण्य व शब्दप्रामाण्य यांची मगरमिठी सोडवून बुद्धिप्रामाण्याची व विवेकनिष्ठेची महती त्यांनी गायिली. स्त्रीशूद्रातिशूद्राच्या मानगुटीवर स्वार झालेल्या भ्रममूलक मिथकांचे वाभाडे काढले. धर्मग्रंथ रचणाऱ्यांची कुटिल कारस्थाने वेशीवर टांगली. कर्मकांडांच्या जळमटांतून मुक्त अशी ईश्वरकल्पना 'निर्मिका'च्या रूपाने उभी केली. परलोकप्रधान जीवनदृष्टीच्या जागी इहलोकप्रधान दृष्टीकोन रुजवण्याचा खटाटोप केला. देव-दैवशरणता, फलज्योतिष, जारण-मारण, भूतबाधा, कर्मकांड, सोवळेपणा, विधी-संस्कार, बुवाबाजी वगैरे अंधश्रद्धांचे विविध आविष्कार कसे तर्कदुष्ट व खुळचटपणाचे आहेत हे त्यांनी परोपरीची उदाहरणे देऊन जनसामान्यांना पटवून दिले. त्याचबरोबर ज्या आर्थिक-सामाजिक दुरवस्थेमुळे स्त्री-शूद्रातिशूद्र अंधश्रद्धांना बळी पडतात ती दूर करण्यासाठी शोषित-वंचितांचे संघटित लढे उभारण्यातही त्यांनी पुढाकार घेतला.

स्त्रीभ्रूणहत्या थांबविण्यासाठी स्वतःच्या घरात बालगृह सुरू केले. स्वतः पुढाकार घेऊन विधवांच्या केशवपनाविरूद्ध नाभिक बंधूंचा संप घडवून आणला. विधवांना सती जाण्यापासून परावृत्त करण्यासाठी त्यांचे पुनर्विवाह सुरू केले. घरीच विधवांसाठी सुतिकागृह सुरू केले. त्यात ३५ पेक्षा जास्त ब्राह्मण विधवा स्त्रियांची बाळंतपणे स्वतः केली. स्वतःच्या घरचा पाण्याचा हौद सर्वांसाठी खुला केला. एका विधवेच्या अनाथ मुलाला दत्तक घेऊन त्याचे संगोपन केले. जोतीरावांच्यानंतरही सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे सुरू ठेवले. घरी

**(पृष्ठक्रमांक २० वर)**



# सुपाएवढ्या काळजाचा डोंगराएवढा माणूस : एन. डी. पाटील

**एकनाथ पाटील** । इस्लामपूर
९४२११२८५०८२

डाव्या - पुरोगामी चळवळींसाठी प्राण पणाला लावणारे आणि परिघाबाहेर फेकलेल्या फाटक्या, तुटक्या माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी झगडणारे बहुआयामी ‘लोकनेते’ म्हणून संपूर्ण महाराष्ट्र डॉ.एन.डी. पाटील यांना ओळखत होता. परिवर्तनवादी चळवळीसाठी ‘एनडी’ही दोन अक्षरं रस्त्यावरच्या निकराच्या ‘संघर्षाचं प्रतीक’ होती. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा समन्वय त्यांच्या आचार-विचारात होता. कणखर वैचारिक भूमिका हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मूळ गाभा होता. कार्यकर्ते घडविणारी कार्यशाळा म्हणून चळवळीतील नवी पिढी आजही त्यांच्या आयुष्याकडे पाहते.



ढवळी (ता. वाळवा, जि. सांगली) येथे कृष्णाबाई आणि ज्ञानदेव पाटील या शेतकरी दाम्पत्याच्या पोटी ते जन्मले. पेठवडगाव येथील दारू दुकान बंद करण्यासाठी केलेल्या आंदोलनामुळे वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांना आयुष्यातला पहिला कारावास भोगावा लागला. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील प्रतिसरकारच्या चळवळीने भारलेले वातावरण आणि राष्ट्र सेवा दलाचे संस्कार यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. विद्यार्थीदशेत पांडुरंग परीट, आर. व्ही. खैरमोडे, ए.डी.अत्तार या शिक्षकांच्या मार्गदर्शनाने त्यांच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. सामान्य माणसांसाठी आयुष्य झिजवण्याचा वसा आणि वारसा त्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून मिळाला. मृत्यूशय्येवर असताना हॉस्पिटलमधून रयत शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाला विशेष पत्र लिहून ’रयत’चे सभासद करण्याबाबत अण्णांनी दाखविलेला विश्वास ’रयत’ चे चेअरमन म्हणून पुढे आयुष्यभर एन. डी. पाटील यांनी सार्थ ठरविला. अण्णांच्या ध्येयधोरणांपासून ’रयत’ तसूभरही हलणार नाही, याची आयुष्यभर निष्ठेने दक्षता घेतली.

स्वातंत्र्याच्या स्थित्यंतरादरम्यान शोषित-वंचितांच्या हक्कांसाठी काळाची गरज म्हणून अस्तित्वात आलेल्या आणि खुद्द कर्मवीर अण्णा, क्रांतिसिंह नाना पाटील संस्थापक सदस्य असलेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या तत्त्वज्ञानाकडे ते ओढले गेले. पक्षाच्या मुखपत्राचे गठ्ठे हातावर घेऊन मथळे ओरडत मुखपत्र विकणारा तरुण कार्यकर्ता ते पक्षाचा प्रमुख मार्गदर्शक हा त्यांचा सुमारे सत्तर वर्षांचा एकपक्षीय प्रवास स्तिमित करणारा आहे. १९७२ मध्ये दुष्काळग्रस्त जनतेच्या मागण्यांसाठी इस्लामपूर कचेरीवर त्यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या मोर्चावर शासनाने गोळीबार केला. त्यात त्यांच्या पुतण्यासह चार कार्यकर्ते हुतात्मे झाले. तरीही खचून न जाता हा लढा त्यांनी नेटाने लढवला. गोळीबाराच्या या घटनेनंतर हुतात्म्यांच्या वारसांसाठी स्वतःच्या कमाईतून पेन्शन योजना सुरू करून सामाजिक बांधिलकीचा नवा पायंडा त्यांनी पाडला. ही योजना गेली पन्नास वर्षे अखंड सुरू आहे.

विधान परिषदेत अठरा, विधानसभेत पाच अशी एकूण तेवीस वर्षे ते लोकांचे आमदार होते. या दरम्यान सहकारमंत्री म्हणून प्रसंगी नियमात बदल करून लोकांचे प्रश्न त्यांनी मार्गी लावले. शेती आणि शिक्षण हे त्यांच्या आस्थेचे विषय होते. शेतकऱ्यांनी संघटितपणे संघर्ष करण्याचा पर्याय ते सुचवित आले. असे संघर्ष योग्य दिशेने चालले, तर आणि तरच आजच्या आणि उद्याच्याही काळातील शेतकरी टिकू शकतील, अशी

त्यांची धारणा होती. 'शिक्षण हे राष्ट्राने करावयाचे धर्मादाय काम नसून, राष्ट्राच्या भविष्यकालीन विन्यासाठी केली जाणारी ती एक फलदायी गुतवणूक आहे' या त्यांच्या मतावर ते नेहमीच आग्रही राहिले. त्यामुळेच गोर-गरिबांच्या हक्काच्या शिक्षणावर गंडांतर आणणाऱ्या महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणविषयक श्वेतपत्रिकेला त्यांनी कडाडून विरोध केला. त्या विरोधात रान उठवले. केवळ अभ्यासाआधारे सभागृहाचे मतपरिवर्तन घडवून श्वेतपत्रिका माघारी घ्यायला लावलेला देशातला हा एकमेव असा ऐतिहासिक लढा होता. त्या लढ्याचे एकमुखी नेतृत्व त्यांनी केले होते.

कणखर वैचारिक भूमिका हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा गाभा होता. आयुष्यभर त्यांनी जे लढे लढवले त्यामध्ये सर्वस्व पणाला लावून ते उतरले. सार्वजनिक जीवनात ते कमालीचे पारदर्शी होते. आत एक आणि बाहेर दुसरेच असे त्यांचे व्यक्तिमत्व नव्हते. स्वतःच्या विचारांशी ते अत्यंत प्रामाणिक होते. शब्दासाठी कोणतीही किंमत मोजायची त्यांची तयारी असे. सत्तेसाठी कधीही कुठल्याही प्रलोभनाला ते बळी पडले नाहीत. हाती घेतलेल्या प्रत्येक प्रश्नात सर्वस्व ओतून लढणे हा त्यांचा स्थायीभाव होता. न्यायाची चाड, अन्यायाची चीड , सतत अभ्यास, अविरत चिंतन, निर्भयता आणि नैतिकता ही त्यांच्या लढ्यांची आयुधे होती. त्या बळावर अनेक लढे त्यांनी यशस्वी केले. लोकांशी संवाद हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष होता. सर्वसामान्य माणसांची दुखणीखुपणी समजून घेऊन ती सोडवण्यात अख्खे आयुष्य त्यांनी खर्ची घातले. शेतमालाच्या किफायतशीर किमतीचा लढा आयुष्यभर अतिशय नेकीने ते लढत आले. नव्वदच्या दशकात सुरु झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ते कमालीचे अस्वस्थ होते. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सतत ते एकीकडे शासनाशी संघर्ष करीत आले आणि दुसरीकडे सतत शेतकऱ्यांशी संवाद करीत होते. संवादाने अनेक प्रश्न सुटतात यावर त्यांचा भर असे. त्यांचे व्यक्तिमत्व कमालीचे संवादी होते. महाराष्ट्राच्या पटावर त्यांनी १९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा, एनरॉनसह रायगडचा सेझ लढा, कोल्हापूरचे टोल आंदोलन, आदिवासींच्या वनजमीन हक्काचा लढा, वीजदराचा लढा, सीमा लढा असे एक ना अनेक लढे संविधानाच्या चौकटीत राहून यशस्वी केले. अपवाद वगळता सतत विरोधी पक्षात राहूनही लोकांच्या मनात त्यांचे स्थान अढळ होते. ते खऱ्या अर्थाने लोकांचे नेते होते.

वारेमाप दराने एनरॉची वीज घेण्यावाचून गत्यंतर नसल्याच्या टप्प्यावर त्यांनी एनरॉन विरुद्ध रान उठविले आणि सरकारला प्रकल्प रद्द करावा लागला. गरीब शेतकऱ्यांच्या हजारो एकर जमिनीवर गंडांतर आणणारा रायगडचा सेझ प्रकल्पही त्यांच्या हस्तक्षेपामुळेच सरकारला गुंडाळावा लागला. ज्येष्ठ नेते कॉ. गोविंद पानसरे यांच्या साथीने कोल्हापूरच्या टोलला त्यांनी टोला दिला. गेली अनेक वर्षे सीमावासीयांवरील अन्यायाला ते वाचा फोडत आले होते. आपल्या अखेरच्या दिवसांपर्यंत हा प्रश्न सुटला नसल्याची खंत त्यांच्या मनात होती. परिणामांची फिकीर न करता वयाच्या नव्वदीनंतरही रस्त्यावर उभे राहून ते लोकांना आंदोलनाची हाक देत होते. विविध प्रश्नांवरील लोकांच्या विधायक संघर्षाचे ते 'लोकनायक' होते. भूमिकेवर आधारित संघर्षानंतरही त्यांनी कधीच कोणाशी शत्रूत्व केले नाही आणि म्हणून इतक्या वर्षांच्या संघर्षमय जीवनानंतरही ते अजातशत्रू होते. 'अंनिस'चे संस्थापक अध्यक्ष या नात्याने समितीच्या स्थापनेपासूनच समितीशी त्यांचे नाते अविभाज्य होते. डॉ. नरेंद्र दाभोलकर तर त्यांना 'फ्रेंड, गाईड आणि फिलॉसॉफर' मानत होते.

चळवळींच्या यशाचे शास्त्र आणि शस्त्रं स्वतःच्या कृती आणि उक्तीतून त्यांनी विकसित केली. 'संघर्षाच्या प्रश्नांवर अंतर्गत मतभेद विसरून सर्व डाव्या चळवळींनी एकत्र यायला हवे. विचारांपेक्षा कुणीही एक व्यक्ती मोठी नसते. चळवळ पुढे न्यायची असेल, तर विचारानं पक्की असलेली माणसं एकत्र जमली पाहिजेत. त्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विचारांवर पक्की निष्ठा ठेवून एकत्र वाटचाल केली पाहिजे.' अशी उद्याच्या चळवळीची दिशा ते नेहमी सूचित करीत होते. वयाच्या त्र्याण्णव्या वर्षीही कामाची प्रचंड उर्जा असलेला सुपाएवढ्या काळजाचा हा डोंगराएवढा माणूस अचानक काळाने हिरावून नेला. वयाला पर्याय नसतो. त्यांच्या जाण्याने एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. जी कशानेही भरुन निघणे अशक्य आहे. मात्र सामान्य माणसांचे जगणे सर्वांगांनी घेरलेले असताना त्यांनी सुचवलेल्या संघर्षाच्या मार्गावरुन वाटचाल करण्याशिवाय पर्याय नाही.

**(पृष्ठक्रमांक ३३ वर)**

# सर्वांगीण लैंगिकता शिक्षण



**सचिन थिटे ।** मुंबई
८४२४०४११५९

आपल्या समाजात, आपल्यासहित अनेक तरुण, प्रौढ, एवढेच काय अगदी साठी उलटलेल्या व्यक्तींनासुद्धा जीवनात कधीतरी वाटलेले असते की, आपल्याला योग्य वयात लैंगिकतेचे पुरेसे, योग्य ज्ञान असते तर जीवनाचा आनंद अधिक निकोप आणि विशुद्धतेने उपभोगता आला असता. लैंगिकतेच्या अज्ञानामुळे अनेकांच्या आयुष्यात समस्या निर्माण झालेल्या दिसतात, काहींच्या जीवनात तर यामुळे वादळे निर्माण झालेली असतात. यावरून जीवनातून कधीच विलग न करता येणाऱ्या या विषयाची शास्त्रीयदृष्ट्या माहिती करून घेणे ही एक अतिशय महत्त्वाची गरज असल्याचे स्पष्ट होते.

लैंगिकता शिक्षण हा व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठीच्या अभ्यासक्रमामधील एक महत्त्वाचा घटक आहे. याचा उद्देश कोणत्याही व्यक्तीला त्याच्या लैंगिक आरोग्यासंबंधी निकोप नि सम्यक ज्ञान देणे, तसेच पुढील आयुष्यात लैंगिकतेसंदर्भात कोणतेही निर्णय अधिक माहितीपूर्ण आणि सम्यक पद्धतीने घेण्यासाठी आवश्यक असणारे सर्वांगीण ज्ञान, कौशल्ये आणि वृत्तीने सुसज्ज करणे आहे. बदलत्या काळानुसार समाज म्हणून आपण सगळेच सातत्याने विकसित होत असताना आपल्या संपूर्ण आरोग्याच्या समस्यांचे स्वरूप बदलते आहे, त्याबरोबर लैंगिकतेच्या व लैंगिक आरोग्याच्या समस्यांचे स्वरूपदेखील बदलते आहे. लैंगिकतेचे परीघ आणि त्याविषयीची सामाजिक समज विस्तारत असतानाच काही समस्यासुद्धा निर्माण होत आहेत. म्हणूनच सर्वांगीण लैंगिकता शिक्षणाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

लहानपणापासूनच मुला-मुलींच्या मनात अनेक गोष्टींविषयी कुतूहल असते. त्यातील इतर गोष्टींविषयी असणाऱ्या कुतुहलाचे पालक, शिक्षक आणि आजूबाजूच्या समाजाकडूनसुद्धा कौतुक होत असते, त्याविषयी या सर्वांकडून त्यांना अधिक माहितीसुद्धा मिळते; पण लैंगिक प्रश्नांसंबंधी मात्र कुणाकडूनच काही माहिती मिळत नाही. त्याविषयीच्या कुतुहलाचे कौतुक तर सोडाच, पण स्वागतसुद्धा होत नाही. उलट त्याविषयीची नकारात्मक प्रतिक्रियाच खूपदा त्यांच्या अनुभवाला येते. नेमके त्याच वेळी प्रसारमाध्यमांतून मात्र त्यांच्या मनातील या कुतुहलाला आणि त्याविषयीच्या भावनांना अधिकचे व कधी कधी अयोग्य प्रकारे खतपाणी घातले जाते. अशा वेळी हे मनातील प्रश्न, कुतूहल तसेच राहतात, तर कधी त्यातील गुंतागुंती वाढत जातात. मग पुढे जाऊन मित्र-मैत्रिणी, समवयस्कांकडून, वेगवेगळ्या ठिकाणी वाचलेल्या अथवा ऐकलेल्या प्रणयकथा, चित्रपट, पॉर्न क्लिप्स अशा ज्या ज्या माध्यमांतून त्यांना शक्य होईल त्या त्या माध्यमांतून ते माहिती मिळवण्याचा प्रयत्न करत असतात. यातून बऱ्याचदा चुकीचीच माहिती मिळण्याची शक्यता जास्त असते. या वयात मिळालेली ही चुकीची माहिती व त्यातून तयार झालेल्या चुकीच्या धारणा पुढे आयुष्यभर कायम राहू शकतात. चुकीची माहिती आणि चुकीच्या धारणांमधून भयगंड, न्यूनगंड एवढेच नव्हे तर विकृतीसुद्धा निर्माण होऊ शकतात. कधी या विकृती सामाजिक समस्यासुद्धा बनतात. यासाठीच योग्य त्या वयातच मुला-मुलींना लैंगिकता शिक्षण देणे खूप गरजेचे असते.

लैंगिकता शिक्षण अधिकाधिक विद्यार्थी, मुलेमुली आणि समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पालक, शिक्षक आणि आजूबाजूचा समाज व समाजातील कृतिशील गट यांचा सहभाग खूप महत्त्वाचा आहे. पण प्रत्यक्षात परिस्थिती पाहता हेच घटक लैंगिकता शिक्षणाच्या मार्गातील मुख्य अडथळा बनलेले दिसतात. याचे कारण म्हणजे पालक, शिक्षक व एकूणच समाजाचा लैंगिकता शिक्षणाकडे पाहण्याचा चुकीचा दृष्टीकोन. लैंगिकता शिक्षण म्हणजे केवळ 'लैंगिक संबंधाची क्रिया, त्याविषयीचे शिक्षण' असेच अनेकांना वाटते. मुळात लैंगिकता व लैंगिक संबंध या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत हे आधी लक्षात घ्यायला हवे. लैंगिक संबंधांविषयी माहिती हा लैंगिकता शिक्षणातील एक महत्त्वाचा मुद्दा असू शकतो, जो त्या त्या वयातील गरजेनुसार मुलांना समजेल

अशा भाषेत सांगितला जायला हवा. पण लैंगिकता शिक्षण हे फक्त तेवढ्यापुरतेच मर्यादित नसून त्यापेक्षा खूप अधिक व्यापक स्वरूपाचे आहे. लैंगिकता म्हणजे लिंगविषयक मानसिकता. स्त्री, पुरुष किंवा इतर लैंगिकतेच्या व्यक्तींचे लिंगविषयक विचार, भावना आणि वर्तन म्हणजे लैंगिकता होय. ही लैंगिकता प्रत्येकाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत असते. लैंगिकतेविषयीचे आपले विचार आणि त्यातून येणारा आचार यातून आपली लैंगिकता घडत असते आणि आपली लैंगिकता आपल्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य भाग असते. जगातील प्रत्येक व्यक्तीने आयुष्याच्या एका टप्प्यावर लैंगिकतेविषयीचे कुतूहल, शंका, समस्या यांचा अनुभव घेतलेला असतो आणि त्यांना त्यांचे समाधान, उपाय मिळविण्यात अडचणी आल्याचा देखील अनुभव असतो. तरीही व्यक्ती मोठ्या झाल्यावर पौगंडावस्थेतील व्यक्तींना लैंगिकतेविषयी शास्त्रशुद्ध ज्ञान मिळावे यासाठी उत्सुक का नसतात, हा मोठा प्रश्न आहे. लैंगिकतेविषयी योग्य त्या वयात योग्य ती माहिती मुला-मुलींपर्यंत पोचवण्यासाठी लैंगिकता शिक्षणाची गरज आहे.

लैंगिकता शिक्षणाची सुरुवात अगदी बाळ जन्माला आल्यापासून किंवा त्याच्याही आधीच घरातील माणसांच्या मनात व घरातील वातावरणात होत असते. मुलगा जन्माला यावा की मुलगी? याविषयी त्या त्या घरातील प्रत्येक माणसाच्या मनात काहीतरी विचार असतात, ज्यांचा परिणाम त्या बाळाच्या जन्मापासून त्याच्यावर वा तिच्यावर होत असतो. मग लहानपणापासून मुलगा वा मुलगी म्हणून मिळणारी वागणूक, आईवडील व नातेवाईक यांच्याकडून मिळणारे प्रेम, त्यांचे स्पर्श, कपडे, खेळ, खेळणी यांसारख्या अनेक गोष्टींतून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे बाळाची लैंगिकता घडत असते. पुढच्या टप्प्यावर त्यांच्या मनात येणारे प्रश्न, त्यांच्या व इतरांच्या लैंगिक अवयवांविषयीचे कुतूहल, ते जाणून घेण्याची इच्छा व त्यावर त्यांना मिळणारा प्रतिसाद यातून त्यांचे विचार तयार होत जातात.

वयात येताना शरीरात होणारे बदल हे अनेकदा मुला-मुलींना अनपेक्षित व गोंधळात टाकणारे असतात. मुलांच्या व मुलींच्या शरीराची बदलत जाणारी ठेवण, शरीरातील हार्मोन्सच्या अंतःस्रावामुळे त्यांच्या मनात निर्माण होणाऱ्या आकर्षण, राग, लोभ, मान, अपमान अशा भावना व त्यावेळी त्यांना मिळणारे आजूबाजूचे वातावरण यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत असते.

या वयात एखाद्याबद्दल वाटणाऱ्या आकर्षणाच्या भावनेला प्रेम समजून त्यातून चुकीचा जोडीदार निवडीची शक्यता किंवा मनात येणाऱ्या लैंगिक आकर्षणाच्या भावनेतून किंवा कुतुहलापोटी लैंगिक संबंध घडण्याची, त्यातून फसवणुकीची, अबोध वयात मातृत्वाची किंवा इतर अनारोग्याच्या समस्या उद्‌भवण्याची शक्यता अधिक असते. अशा वेळी पालकांचा मुलांसोबत असणारा रॅपो (सुसंवाद), परस्परविश्वास अधिक महत्त्वाचा असतो. पालक आणि मुलांच्या योग्य वेळीच झालेल्या लैंगिकता शिक्षणामुळे या धोक्यांपासून वाचणे व अशी परिस्थिती योग्य पद्धतीने हाताळणे अशा दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात. अचानक आलेल्या मासिक पाळीविषयी आधी काही माहिती मिळालेली नसेल किंवा चुकीची माहिती असेल तर त्यातून मुलींचा होणारा गोंधळ, भीती व मासिक पाळीविषयी चुकीच्या प्रथा-परंपरा, गैरसमज व अंधश्रद्धा आजूबाजूला असतील तर पाळीविषयी मनात नकारात्मक भावना तयार होऊन त्या पुढे आयुष्यभर त्रासदायक ठरू शकतात. तसेच मुलांच्याबाबतीत अचानक लिंगात येणारी ताठरता व त्यातून कधी कळत-नकळतपणे, कधी अचानक झोपेत झालेली वीर्यमुक्ती (यासाठी सर्रास वापरला जाणारा 'स्वप्नदोष' हा शब्द चुकीचा असल्याने त्याला पर्यायी शब्द सुचवला आहे. हाच शब्द समाजात रूढ करणे अधिक योग्य राहील असे वाटते.) या बाबी मुलांना आधी त्याविषयी माहिती नसतील तर त्यांना गोंधळात टाकणाऱ्या व मनात संकोच, भीती आणणाऱ्याच असू शकतात. वयात येणाऱ्या मुला-मुलींना या सर्व गोष्टींविषयी पालक, शिक्षक यांच्याकडून योग्य माहिती न मिळाल्याने चुकीच्या व्यक्तींकडून चुकीची माहिती मिळण्याची शक्यताच जास्त असते.

अनेकदा लहान मुला-मुलींना फसवून त्यांचे लैंगिक शोषण करण्याचे प्रकारसुद्धा घडतात. अशा वेळी मुला-मुलींना त्यांच्या लैंगिक अवयवांविषयी व त्यांच्या गुप्ततेविषयी आधीच योग्य माहिती दिलेली असेल तर हे प्रकार टाळता येऊ शकतात. अशा वेळी काय करायचे हे मुलांना आधीच शिकवून ठेवता येऊ शकते. लैंगिकता शिक्षणातून हे धडे मुलांना देता येऊ शकतात. आपल्या आजूबाजूला स्त्री व पुरुष यांच्यासोबतच इतर वेगवेगळ्या लैंगिकता असणाऱ्या व्यक्तीसुद्धा राहातात. या वेगवेगळ्या

लैंगिकता मुलांना (व आपल्यालासुद्धा) माहिती आणि मान्य असायला हव्यात आणि त्यांना तितक्याच सन्मानाने वागवायला हवे. त्यांना आपल्याकडून त्यांच्या लैंगिकतेवरून काही त्रास दिला जाणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. त्यासाठी या सर्व गोष्टींची माहिती मुला-मुलींना योग्य त्या वयातच द्यायला हवी.

सध्या मोबाईलच्या सहज उपलब्धतेमुळे मुले लवकरच इंटरनेटच्या जगात सफर करायला लागतात. अशा वेळी इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या पॉर्न साईट्स मुलांच्या आयुष्यात अजाणत्या वयापासूनच येण्याची शक्यता असते. अशा वयात पॉर्न किंवा ब्ल्यू फिल्म यांच्या माध्यमातून दाखवल्या जाणाऱ्या लैंगिक संबंधांबाबतच्या चुकीच्या गोष्टी मुलांच्या मनात बिंबवल्या जाऊ शकतात. त्याचे पुढे आयुष्यभर चुकीचे परिणाम होऊ शकतात. यासाठी आधीच पॉर्न मधल्या चांगल्या-वाईट गोष्टी, त्यातले वास्तव याविषयी मुलांशी त्यांना समजेल अशा भाषेत संवाद केले गेले, तर पुढे अशा गैरसमज व चुकीच्या परिणामांपासून त्यांना वाचवता येऊ शकते. एका ठराविक वयात मुला-मुलींच्या मनात लैंगिक अवयव, लैंगिक भावना, लैंगिकता व लैंगिक संबंध यासंबंधी जे विचार पेरले जातात ते पुढची अनेक वर्षे कायम राहतात. यासाठीच त्यांना या वयात योग्य माहिती योग्य पद्धतीने पोहोचवण्यासाठी लैंगिकता शिक्षणाची अत्यंत गरज आहे. शिवाय मुला-मुलींसोबतच किंवा शक्यतो त्यांच्याही आधी पालक व शिक्षक यांचे लैंगिकता शिक्षण पूर्ण व्हायला हवे. जेणेकरून मुलांमध्ये व एकूण समाजामध्ये लैंगिकता शिक्षणाचे महत्त्व व त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलू शकेल.

एकूणच लैंगिकता शिक्षण हा व्यक्तीला निरोगी, निकोप, विशुद्ध आणि आनंदी जीवन जगण्यासाठी सक्षम करण्यात उपयुक्त असा एक आवश्यक घटक आहे. योग्य माहिती, सुरक्षित पद्धती, योग्य भाषेतील संवाद, निरोगी नातेसंबंध आणि लैंगिकतेविषयी असणाऱ्या विविधतेचा आदर करायला शिकवणारे सर्वांगीण लैंगिकता शिक्षण हे पुढील पिढीला अधिक जबाबदार निवड करण्याचे आणि अधिक जबाबदार लैंगिक वर्तन करण्याचे सामर्थ्य देऊ शकते. देशातील आणि राज्यातील धोरणकर्ते, पालक, शिक्षक आणि समाज यांच्या एकत्रित प्रयत्नांतून साध्य होऊ शकणारे व्यापक आणि सर्वांगीण लैंगिकता शिक्षण हे सार्वजनिक आरोग्य आणि लोककल्याणाचा आधारस्तंभ बनू शकते.

**(लेखक 'अग्गंबाई! अरेच्या!!' या पुस्तकाचे लेखक व महा.अंनिसचे राज्यसरचिटणीस आहेत.)**

●

---

**(पृष्ठक्रमांक १५ वरून)**

छात्रालय सुरू केले. स्वतःचा दत्तक मुलगा यशवंतचा सत्यशोधक पद्धतीने आंतरजातीय विवाह लावून दिला. दुष्काळात अन्नछत्र सुरू केले. नेटिव्ह फिमेल स्कूल, पुणे आणि दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दि एज्युकेशन ऑफ महार्स, मांग्ज अशा संस्था सुरू केल्या.

जोतिबांच्या विवेकी विचारांच्या सहवासामध्ये सावित्रीबाई फुले यांची प्रखर विवेकी प्रतिभा फुलून गेली. स्त्रियांच्या हक्कांसाठी, त्यांच्या सामाजिक, धार्मिक गुलामगिरीच्या विरोधात प्रत्यक्ष कार्य आणि कृती केली. फुले दाम्पत्याने १८४८ ते १८५२ या चार वर्षांत ठिकठिकाणी मुलींच्या १८ शाळा सुरू केल्या. पुण्यात पहिले नेटिव्ह सार्वजनिक वाचनालय सुरू केले. स्वधर्माची चिकित्सा केली. अंधश्रद्धेला मूठमाती दिली. नवस, व्रत-वैकल्ये यामागे चुकीच्या चालीरीती बहुजनांवर लादल्या गेल्यात, हे समजावून देण्यासाठी लेखन केले. वैदिक धर्ममार्तंडांचा तीव्र विरोध असतानाही महिलांचे जीवनमान आणि शिक्षण सुधारण्यासाठी नेहमीच सावित्रीबाई फुले या अग्रस्थानी राहिल्या. तत्कालीन समाजाने फुले दाम्पत्याच्या आयुष्यात काटेच पेरण्याचे काम केले, तरीही ज्योतिबा सावित्रीबाईंनी समाजाला फुलेच दिली. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या कार्यकर्त्यांना हे माहीत असायला हवे की, आधुनिक महाराष्ट्रात देखील आपल्या चळवळीची परंपरा किमान पाऊणे दोनशे वर्षे जुनी आहे आणि त्या परंपरेपासून आपणास बरेच काही शिकता येण्यासारखे आहे.

**(लेखिका दै. बहुजन सौरभच्या निवासी संपादक आहेत.)**

●

## थोडे तुझे थोडे माझे

पुढे पुढेच जायचे, माघार घ्यायची नाही
थोडे तुझे थोडे माझे, मनातले बोलू काही

पंढरीचा पांडु रंग आहे म्हणतात बुद्ध
कंबरेचा करदोडा, जाणवे करतो शुद्ध
देव खरा देव खोटा, कुणा माहीतच नाही
थोडे तुझे थोडे माझे, मनातले बोलू काही


टाचणी लावी लिंबाला, बांधी मिरच्या चार
बिबा ओवी तारेत, म्हणे नाही होत हार
अंधश्रद्धा कर्मकांड, करता थकतच नाही
थोडे तुझे थोडे माझे, मनातले बोलू काही

फेऱ्या मारून वडाला, सौभाग्याचे मागे दान
पूजा पाठ उपवास आणि वाटतात वाण
भोंदूच्या दर्शना, अनवाणी चालत जाई
थोडे तुझे थोडे माझे, मनातले बोलू काही

कधी उघडणार डोळे, थांबणार सारे कधी ?
नवविचारांचे वारे, घोंगावणार कधी ?
कृतीमध्ये आणण्याची, कधी करणार घाई ?
थोडे तुझे थोडे माझे, मनातले बोलू काही

**सीताराम नरके** । पुणे

**अभिवादन**



**दिवंगत विकास पाटील (अण्णा)** यांचे नुकतेच ह्दयविकाराने निधन झाले. अण्णा नेहमीच अंनिसच्या कामात सोबत राहिले. महा. अंनिसच्या वतीने त्यांना भावपूर्ण आदरांजली

## अभंग

भूत भानामती । करणी नि मूठ ।
सारेचि ते झूठ । अंधश्रद्धा ।।१।।

लिंबू भारियेला । रस्त्यात टाकीला ।
गुण नाही आला । रोग्यालाही ।।२।।

कोणी महाभाग । मंत्र मारियेला ।
ताप नाही गेला । अंगातून ।।३।।

वर्दळीच्या जागी । कुंकू नि हळद ।
भीती ती गडद । मनी वसे ।।४।।

लिंबू मिरचीचा । अँटीव्हायरस ।
दारास तो दिसं । टांगलेला ।।५।।

प्रकार हे सारे । चार भिंतीआड ।
नाही कुणा चाड । विवेकाची ।।६।।

मंत्रांनी ना साधे । पापड मोडती ।
तरी पैदा होती । बुवा-बाबा ।।७।।

सोडुनिया सारे । अघोरी प्रकार ।
देऊया आकार । जीवनाला ।।८।।

आरोग्याचा होई । जेव्हा जेव्हा त्रास ।।
घ्यावा मग ध्यास । डॉक्टरांचा ।।९।।

**पुरुषोत्तम ठाकरे** । गडचिरोली
९४२१८५६७६३





# तरुणाईला भावलेली ‘सोच’: महा. अंनिस युवा छावणी

वृत्तांत

**रूपेश शोभा** (मुंबई), **पूजा पुद्दाल** (नांदेड)
९००४२८२६६३,

नौजवान आओ रे, नौजवान गाओ रे ।।
लो क़दम बढ़ाओ रे, लो क़दम मिलाओ रे ।।
ऐ वतन के नौजवान, इक चमन के बागवान ।
एक साथ बढ़ चलो, मुश्किलों से लड़ चलो ।
इस महान देश को नया बनाओ रे ।।

देशाचं भविष्य म्हणून युवकांकडे मोठ्या आशेने पाहिलं जातं. भारतात युवाशक्ती ही इतर देशांच्या तुलनेत जास्त प्रमाणात आहे. ही युवाशक्ती वाया न जाता देश कार्यासाठी यांची शक्ती लागावी यासाठी अनेक शिबीरे छावण्या महाराष्ट्रामध्ये सुरू असतात. एका बाजूला देशात मोठमोठी सकारात्मक कामं करणारे तरुण मोठ्या प्रमाणात आहेत तर दुसरीकडे जात, धर्म, भाषा या मुद्यांवर कट्टरता पसरवून ध्रुवीकरण करणाऱ्यांच्या गोटातही तरुणांची मोठी संख्या आहे. डॉ. दाभोलकरांचे खून करणारे हात देखील युवकांचेच होते. या पार्श्वभूमीवर तरुणाईला विवेकाच्या वाटेवर आणण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या युवा सहभाग विभागाच्या वतीने The SOCH युवा छावणीची सुरुवात करण्यात आली.




मे महिन्याच्या १७ तारखेला शिबिराच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू झाला. प्रत्यक्ष उद्घाटनाचा कार्यक्रम सुरू होण्याआधी छावणीत सहभागी युवांचे एकूण आठ ग्रुप करण्यात आले. या आठ गटांमध्ये "Treasure Hunt' हा गेम घेण्यात आला. या गेम मध्ये चार Treasure लपवण्यात आले होते आणि ते या गटातील युवांनी शोधून आणायचे होते. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन करून ‘आम्ही प्रकाशबीजे’ हे गीत गात कार्यक्रमाला सुरुवात झाली. उद्घाटनाला प्रमुख पाहुणे म्हणून सिने अभिनेत्री गौरी देशपांडे, सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील तसेच ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि अंनिसच्या माणगाव शाखेचे अध्यक्ष संदेश कुलकर्णी तसेच महा.अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे उपस्थित होते. यावेळी राज्य सरचिटणीस सचिन थिटे, कृष्णात स्वाती, महिला सहभाग विभागाच्या राज्यकार्यवाह आरती नाईक आणि युवा सहभाग विभागाच्या कार्यवाह प्रियांका खेडेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आता हे उद्घाटन वेगळ्या पद्धतीने कसं होतं, तर Treasure Hunt खेळत असताना जे मुलांना Treasure सापडले ते पुढे येऊन त्यांना उघडण्यास सांगितले. प्रत्येक ट्रेझर मधून SOCH या नावाची एक एक अक्षरे बाहेर येत होती आणि ती अक्षरे नंतर त्याच मुलांना तिथे चिटकवण्यास सांगितले आणि पाहुण्यांच्या हस्ते ‘विचार विवेकाचा, ध्यास परिवर्तनाचा’ ही टॅगलाईन लावण्यात आली. अशा प्रकारे एका अभिनव पद्धतीने छावणीचे उद्घाटन झाले. सिनेनाट्य अभिनेत्री गौरी देशपांडे आणि सामाजिक कार्यकर्त्या वैशाली पाटील यांनी उद्घाटनाच्या सत्रामध्ये सर्व शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. महाअंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे सरांनी देखील मुलांचे स्वागत करून त्यांना संबोधित केले.

पहिले सत्र होते ते म्हणजे ‘लिंगसमभाव व लैंगिकता’ या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून आरती व महेंद्र उपस्थित होते. प्रत्येक सत्राचे सूत्रसंचालन हे शिबिरासाठी आलेले युवाच करणार होते. त्याचप्रमाणे पहिल्या सत्राचे देखील सूत्रसंचालन, पाहुण्यांची ओळख व आभार शिबिरासाठी आलेल्या युवांनीच केले. स्त्री व पुरुष कसे ओळखता येतात यांबद्दल मुलांना विचारताच

मुलांनी वेगवेगळ्या प्रकारे उत्तरे दिली. शिबिरार्थींनी दिलेल्या उत्तरांच्या साहाय्याने नवजात जन्मलेल्या दोन बाळांचे लिंग ओळखण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांची उत्तरे निरुपयोगी ठरली. नवजात बालके स्त्री आहे की पुरुष हे फक्त त्यांच्या जननेंद्रियाद्वारे ओळखता येते असे सांगून स्त्री व पुरुषांमधील भेद फक्त बायोलॉजिकल असतो, त्यावरून आपण त्यांच्या क्षमतांमध्ये भेद करू नये हा अगदी सोप्या भाषेत त्यांच्याशी संवाद साधला. लिंग आणि लिंगभाव यातील फरक समजावून देत दैनंदिन आयुष्यातील अनेक उदाहरणांच्या साहाय्याने हा विषय तरुणाई समोर मांडला.

दुसरं सत्र म्हणजे 'मैत्री, प्रेम आकर्षण आणि सेक्स' या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून सचिन थिटे उपस्थित होते. मुलांसोबत प्रेम आणि आकर्षण या मधला फरक कसा ओळखला पाहिजे याविषयी संवाद साधला. चित्रपटाची गाणी आपल्यावर कशाप्रकारे प्रभाव टाकतात कशा वेगवेगळ्या पद्धतीने प्रेम शिकवतात याविषयी त्यांनी युवकांना सजग केले. बऱ्याच वेळा आकर्षणालाच प्रेम समजून असतात आणि त्यातूनच हिंसा घडत असतात. हिंसा ही कधीच प्रेमातून घडत नाही तर ती आकर्षणातूनच घडते असे सांगितले. सेक्स विषयी देखील गैरसमज काय काय असतात याबद्दल त्यांनी संवाद साधला.

तिसरे सत्र म्हणजे 'खगोल विज्ञान आणि फलज्योतिष' हे सत्र घेण्यासाठी 'अंनिप'चे संपादक डॉ. नितीन शिंदे उपस्थित होते. त्यांनी वास्तूशास्त्राबद्दल, खगोल विज्ञानाबद्दल आणि फलज्योतिष, पंचांग कसे पाहिले जाते व हे पाहताना कोणत्या युक्त्या व कल्पना वापरल्या जातात याविषयी सविस्तर माहिती शिबिरार्थ्यांना दिली. तसेच ही सर्व माहिती देताना वैज्ञानिक दृष्टीकोन अवलंबला असता हे सर्व शास्त्र कसे फोल ठरते यांचे स्पष्टीकरण शिबिरार्थ्यांना या सत्राद्वारे व यात होणाऱ्या चर्चेद्वारे मिळाले. वास्तुशास्त्र आणि त्यातील फोलपणा याविषयी देखील त्यांनी माहिती दिली.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्राची सुरुवात संविधानावर रचलेल्या कीर्तनाने झाली.

नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।

महाराष्ट्रात कीर्तन, आणि शाहिरी परंपरेने समाजाचे प्रबोधन करण्यात मोठी भूमिका बजावली आहे, याच कीर्तनरूपी माध्यमाचा उपयोग शिबिरार्थींना समाजाच्या उत्कर्षासाठी संविधान कोणती भूमिका बजावत आहे व संविधानाचे समाजातील महत्व समजावून देण्यासाठी करण्यात आली. संविधान हा सगळ्यांसाठी अवघड वाटणारा विषय कीर्तनातून अगदी सोप्या पद्धतीने सुनील स्वामी यांनी सांगितला.

स्वामी म्हणे याची (संविधानाची) करू नका पूजा। सांगा एक दुजा अर्थ याचा।। असा संदेश स्वामी यांनी आपल्या कीर्तनातून दिला. यानंतर गटचर्चा ठेवण्यात आली होती. आठ गटांना वेगवेगळे विषय देण्यात आले होते, त्या विषयांवर प्रत्येक गटामध्ये चर्चा करून




सादरीकरण करायचे होते. राजकारण 'बी'घडलंय?, आजचा मीडिया, नागरिकत्व सुधारणा कायदा, लव जिहाद, हाताची घडी तोंडावर बोट, इ. असे काही विषय गटचर्चेसाठी देण्यात आले होते. युवकांनी गटात चर्चा करून मिळालेल्या विषयाची उत्तम मांडणी केली.

दुसऱ्या दिवसाचे दुसरे सत्र म्हणजे जेष्ठ विचारवंत, साहित्यिक डॉ. राम पुनियानी यांचे होते. 'धार्मिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर त्यांनी खूप चांगल्या प्रकारे मांडणी केली. त्यांनी सर्वप्रथम मुस्लिमांविषयी समाजात काय विचार बोलले जातात असा प्रश्न विचारून शिबिरार्थ्यांनाही या संवादात सहभागी करून घेतले. शिवाजी महाराज हे फक्त मुस्लिम विरोधी होते हा इतिहास जो सांगितला जातो त्याविषयी त्यांनी युवकांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी इतिहासातील अनेक घटना कशाप्रकारे खोट्या रीतीने रंगवून सांगितल्या जातात व मग त्यांचा वापर करून

कशाप्रकारे धार्मिक द्वेष पसरवला जातो हे सोदाहरणाने स्पष्ट करून सांगितले. त्यामुळे प्रश्न धर्माचा नसून हा प्रश्न सत्तेचा आहे असे त्यांनी येथे अधोरेखित केले.

तिसरे सत्र म्हणजे 'मानसिक आरोग्य आणि युवा' याविषयी मांडणी करण्यासाठी डॉ. अनिल डोंगरे उपस्थित होते. युवांना येणारे डिप्रेशन (नैराश्य) त्यातून



व्यसनाधीनतेकडे वळणारे युवा याविषयी त्यांनी खूप चांगल्या प्रकारे मांडणी केली. तसेच जर रिलेशनशिप किंवा नात्यातील दुरावा/नकारामुळे युवांनी स्वतःला किंवा त्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारची हानी न पोहोचवता, जीवनात नकारात्मकता येऊ न देता, कामांवर लक्ष द्यावे असेही त्यांनी म्हटले आणि नंतर शिबिरार्थींनी विचारलेल्या विविध प्रश्नांची उत्तरे दिली.

तिसरा दिवस पहिले सत्र सुरू झाले. 'विवेकी व्यक्तिमत्व विकास' या विषयावर विनायक सावळे यांनी खूप चांगल्या प्रकारे मांडणी केली. विवेकी व्यक्तिमत्व विकास कसे घडवायचे याविषयी त्यांनी काही उदाहरण देऊन सांगितले. या सत्रात त्यांनी पुढील चार व्यक्तिमत्त्वांची माहिती दिली. १.स्वतः ला ज्ञात, इतरांना ज्ञात २. स्वतः ला ज्ञात, इतरांना अज्ञात ३. स्वतः ला अज्ञात, इतरांना ज्ञात ४. स्वतःला अज्ञात, इतरांना अज्ञात, अशा प्रकारच्या विविध व्यक्तिमत्वांचे स्वतः मधील गुणकौशल्य स्वतः व इतरांनाही माहिती असणं व नसणं ह्या विषयी सादरीकरण करून दाखवले. स्वतःचा शोध घेण्याची एक दिशा शिबिरार्थींना मिळाली.

यानंतर होतं 'सोशल एक्सपिरिमेंट' यामध्ये काही घटना युवकांसमोर ठेवण्यात आल्या. या घटना त्या युवकांच्या डोळ्यासमोर घडणार होत्या आणि युवकांना त्या घटनेला रिऍक्ट/व्यक्त व्हायचे होते. पहिली घटना त्यांच्यासमोर दाखवण्यात आली म्हणजे रस्त्यावर 'एका महिलेला छेडलं जातं' दुसरी घटना होती 'रोड एक्सीडेंट' तिसरी घटना होती 'डोमेस्टिक व्हायलन्स' आणि शेवटची घटना होती 'धार्मिक द्वेषा मधून एका व्यक्तीस समूहाने मारहाण करणे' म्हणजेच मॉब लिंचिंग. प्रत्येक युवक आपापल्या पद्धतीने रिऍक्ट झाला. त्यानंतर त्या घटनेबद्दल प्रियंका व महेंद्र यांनी चर्चा घडवून आणली. घटना पाहिल्यानंतर प्रत्येकाला काय वाटलं, प्रत्येकाने कशाप्रकारे मदत केली, जे मदतीसाठी पुढे आले नाहीत त्यांना काय वाटले, याविषयी चर्चा करण्यात आली. आपल्या डोळ्यासमोर हिंसा घडत असताना आपण केवळ बघ्याची भूमिका घ्यायची का असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. आपण एकटे पुढे जाण्यास घाबरत असलो तर इतर लोकांना प्रोत्साहित करू शकतो. केवळ बघ्याची भूमिका न घेता आपण किमान हस्तक्षेप करायला हवा असे पुढे आले.

समारोपाच्या सत्रामध्ये शिबिरासाठी आलेल्या युवकांनी मनोगते व्यक्त केली. महाराष्ट्रभरातून येणाऱ्या तरुणाईशी संवादातून विवेकी मूल्य रुजवण्याचा आणि माणूस म्हणून घडण्याच्या प्रक्रियेचा भाग होण्याचा कृतिशील प्रयत्न यशस्वीपणे पार पडला. समारोप सत्रामध्ये शिबिरार्थींची मनोगते ऐकून ज्या उद्दिष्टांसाठी ही युवा छावणी आयोजित केली ते साध्य झाल्याची भावना सर्व कार्यकर्त्यांच्या मनात होती. सर्व नियोजनामध्ये विभागवार युवा कार्यकर्त्यांची टीम एकत्र काम करत होती आणि त्यामुळे हे सहजशक्य झालं, तसेच स्थानिक नियोजनापासून ते अंतिम दिवसापर्यंत रायगड जिल्ह्यातील साथी, पनवेल शाखेतील सर्व कार्यकर्त्यांची अपार मेहनत सार्थकी लागली. महाराष्ट्रभरातून एकत्र आलेले युवा कार्यकर्ते सर्वांच्या पूर्व नियोजन आणि परिश्रमातून सोच युवा छावणी खेळीमेळीच्या वातावरणात यशस्वीरीत्या पार पडली, प्रतिसाद खूप चांगला मिळाला. तेजल, महेंद्र ओव्हाळ, रुपेश, कल्पेश, राधा, मंगेश, निखिल, मयूर, सुमित, तुळशीदास, पूजा, तुषार, सिद्धेश, प्रियांका, निशा आणि संयोजनात राबलेल्या पनवेल शाखेच्या सर्वच कार्यकर्त्यांची मेहनत रंग लायी असं म्हणायला हवं.

आम्ही प्रकाशबीजे रुजवित चाललो, वाटा नव्या युगाच्या रुळवीत चाललो...

●



# विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठक

**डॉ. टी. आर. गोराणे ।** नाशिक
९४२०८२७९२४

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणीची बैठक इस्लामपूर येथे नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न झाली. राज्यभरातून ३०० हून अधिक पदाधिकारी या बैठकीस उपस्थित होते. या बैठकीचे उद्घाटन नामवंत बांधकाम व्यवसायिक व सामाजिक कार्यकर्ते महेश मोरे (नाना) यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महा. अंनिसचे राज्य उपाध्यक्ष व राजारामबापू सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील होते. उद्घाटन सत्रात बोलताना महेश मोरे म्हणाले की, ''कथित वास्तुशास्त्राच्या नादाला लागून अनेकांची आर्थिक फसवणूक झाली आहे. माझ्या व्यक्तिगत जीवनातील कोणतीच गोष्ट मी मुहूर्तावर केली नाही, तरीही मी आयुष्यात आनंदी व सुखी आहे. दैववादाची भीती बाजूला सारून निर्भयपणे आयुष्य जगता आले पाहिजे.'' अध्यक्षीय समारोप करताना प्रा. शामराव पाटील म्हणाले, ''अंधश्रद्धामुक्त समाज बनवण्यासाठी आपणास खूप कष्ट करावे लागतील. राज्यभर आपले काम प्रगतीपथावर आहे.'' यावेळी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे व राज्य अध्यक्ष अविनाश पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. सांगली जिल्हा कार्याध्यक्ष निलेश कुडाळकर यांनी स्वागत तर प्रास्ताविक राज्य प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी केले. डॉ. ठकसेन गोराणे, राज्य सरचिटणीस कृष्णात कोरे, सुधाकर काशीद, रुक्साना मुल्ला, विजय परब, शहाजी भोसले, विनायक सावळे, सांगली जिल्हा अध्यक्ष प्रा.विजयकुमार जोखे, प्रा. एल. डी. पाटील, प्रा.बी. आर. जाधव उपस्थित होते. एम.डी. जाधव यांनी आभार मानले तर डॉ. काशीलिंग गावडे यांनी सूत्रसंचालन केले.




राज्य कार्यकारिणी बैठकीच्या निमित्ताने ज्येष्ठ सामाजिक विचारवंत किशोर बेडकिहाळ यांचे जाहीर व्याख्यान आयोजित केले होते. 'भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल' या विषयावर किशोर बेडकिहाळ म्हणाले की, ''राष्ट्रवाद ही खूप व्यापक संकल्पना आहे. जात, धर्म, वर्ग, प्रांत आदिंच्या निष्ठा सोडल्याशिवाय राष्ट्रवाद वाढणार नाही. कडवी राष्ट्रनिष्ठा ही देशाला घातक ठरू शकते. समतेवर आधारित निकोप समाजनिर्मिती ही आजच्या काळाची गरज आहे.'' या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य व कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. आर. डी. सावंत होते. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, वाळवा तालुका शिक्षण संस्थेचे सहसचिव ॲड. धैर्यशील पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील डॉ. राहुल मोरे, डॉ. अरुण कोलप, उद्योजक श्रीनिवास आठवले, ॲड. सुखदेव माळी, श्रीमती सुरेखा शिंदे, प्रा. एस. बी. माने, प्रा. डॉ. प्रमोद गंगनमाले, दयानंद अकॅडमीचे शरद साळुंखे यांना आधारस्तंभ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रहणातील अंधश्रद्धा झुगारल्याबद्दल नवेखेडची पूजा आणि ऋषिकेश जाधव यांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्वागत व प्रास्ताविक संजय बनसोडे यांनी तर प्रा. डॉ. तृप्ती थोरात यांनी सूत्रसंचालन केले. महा. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी, समविचारी संस्था व संघटना यांच्या पदाधिकारी संवाद यावेळी संपन्न झाला. कॉम्रेड धनाजी गुरव, उमेश कुरळपकर, मिलिंद जाधव, शंकर चव्हाण, बी.जी.पाटील, रणजीत चव्हाण, प्रा.अर्जुन पन्हाळे, प्रा.राजा माळगी यांनी सहभाग घेतला. शेवटी विजय नांगरे, अशोक बाबर, वंदना कांबळे, भास्कर सदाकळे, चंद्रकांत मिसाळ, जोवेल मिसाळ यांनी यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

बैठकीच्या दुसऱ्या दिवशी माजी मंत्री व आमदार जयंतराव पाटील यांनी सदिच्छा भेट देऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला. यावेळी आमदार जयंतराव पाटील म्हणाले, ''आधुनिक काळातही अंधश्रद्धा निर्मूलनाची

अत्यंत उपयुक्तता आहे. देशातील संत-सुधारकांचा वारसा पुढे घेऊन जाणाऱ्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीस समाजाने सहकार्य केले पाहिजे. विवेकी समाजनिर्मितीसाठी अंनिसचे योगदान मोठे आहे. समाजातील चळवळी टिकल्या पाहिजेत, त्यासाठी सूज्ञ लोकांनी चळवळीच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.'' आमदार पाटील यांच्या हस्ते जादूटोणा विरोधी कायद्याच्या चित्रमय पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

सायंकाळच्या सत्रात इस्लामपूर शहरातून संविधान सन्मान फेरीचे आयोजन केले होते. शहरातील प्रमुख मार्गावरून संविधानाचा जयघोष करीत, प्रबोधनाची गाणी गात कार्यकर्त्यांनी फेरी काढली. छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून संविधान फेरीचा समारोप करण्यात आला.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या वार्षिक लक्ष्यवेधी आणि शतकवीर पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ विचारवंत आणि श्रमिक मुक्तीदलाचे नेते डॉ. भारत पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आले. मानवमुक्तीच्या लढ्यासाठी प्रत्यक्ष मैदानात उतरून लढावे लागेल. व्यवस्था परिवर्तनाचे काम सातत्याने करावे लागेल, समविचारी लोकांनी सोबत राहून समाज बदलाचा ध्यास घ्यावा लागेल, असे मत डॉ. भारत पाटणकर यांनी यावेळी व्यक्त केले. पत्रिकेचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी पत्रिकेच्या वार्षिक पुरस्काराची भूमिका मांडली. यावेळी संपादक मंडळ डॉ. सुशील मेश्राम, प्रा. श्यामसुंदर मिरजकर, अजय भालकर, प्रल्हाद मिस्त्री, राजेंद्र फेगडे, तुकाराम शिंदे आदी उपस्थित होते. सुरज पाटील, आरबाज पटेल यांनी संयोजन केले.

**विभागांचा आढावा**

**वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प :** या विभागाचा अहवाल राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर व प्रकाश कांबळे यांनी सादर केला. सर्व जिल्ह्यात स्वयंअध्ययन परीक्षेला विद्यार्थी बसवणे, नवीन शैक्षणिक वर्षात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांच्या शिबिरांचे आयोजन करण्याचे ठरले. शालेय विद्यार्थ्यांसाठी चमत्काराच्या प्रयोगाची पुस्तिका नव्याने काढण्याचे निश्चित झाले.

**युवा सहभाग विभाग :** राज्य कार्यवाह प्रियांका खेडेकर, सहकार्यवाह अमोल चौगुले, रुपेश वानखेडे यांनी मागील चार महिन्यांचा कार्यवृत्तांत मांडला आणि पुढील कार्यक्रमाचे नियोजन केले. या विभागाच्या पुढाकाराने 'सोच' या युवा छावणीस राज्यभरातून चांगला प्रतिसाद मिळाला, त्यामुळे दरवर्षी अशी युवा छावणी घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच राज्यभरातील संपर्क दौऱ्याचा आढावा घेतला.

**महिला सहभाग विभाग :** या विभागाच्या राज्यकार्यवाह आरती नाईक, सहकार्यवाह सारिका डेहणकर यांनी सविस्तर आढावा घेतला. या विभागांनी आयोजित केलेल्या मानसिक आरोग्याबाबतच्या ऑनलाईन व्याख्यानास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. लिंग समभावाबद्दलचे निवासी शिबिर लवकरच घेण्यात येणार असल्याचे विभागाने सांगितले.

**विविध उपक्रम विभाग :** राज्य कार्यवाह अनिल करवीर, सहकार्यवाह  रामदास देसाई यांनी त्यांच्या कामाचा आढावा घेतला. पुढील महत्त्वाच्या उपक्रमाचे नियोजन बैठकीत मांडले. उपक्रमशीलता जपण्याचे आवाहन या विभागाने केले आहे.

**बुवाबाजीविरुद्ध संघर्ष विभाग :** राज्य कार्यवाह ॲड. गोविंद पाटील, सहकार्यवाह विष्णुदास लोणारे यांनी आपल्या विभागाचा आढावा घेऊन राज्यभरातील बुवाबाजी प्रकरणाची सूची करण्याची ठरले.

**प्रशिक्षण विभाग :** या विभागाने आयोजित केलेल्या संघटनात्मक प्रशिक्षण शिबिराचा आढावा घेऊन पुढील नियोजन सांगितले. संघटनात्मक प्रशिक्षण हे सर्व पदाधिकाऱ्यासाठी अनिवार्य आहे. पुणे येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय प्रशिक्षणाचा आढावा घेतला, ते कार्यकर्त्यांना अधिक भावल्याच्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. विभागाचे राज्य कार्यवाह सुरेश बोरसे, सहकार्यवाह सुधाकर तट यांनी पुढील नियोजनही सांगितले.

**मानसिक आरोग्य विभाग :** राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी या विभागाचा आढावा घेतला. शाखा व जिल्हास्तरावरील मानसिक आरोग्यतज्ज्ञांना कार्यकर्त्यांनी जोडून घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

**सोशल मीडिया विभाग :** राज्य कार्यवाह किर्तीवर्धन तायडे यांनी संघटनेच्या विविध हँडलचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन केले. आपली वेगवेगळी हँडल्सवर संघटनेचे कार्यक्रम, उपक्रम प्रतिबिंबित झाले पाहिजेत.

**जोडीदाराची विवेकी निवड विभाग :** राज्य कार्यवाह हर्षल

जाधव यांनी आतापर्यंत घेतलेल्या संवाद शाळाबद्दल माहिती दिली. पुढील काळात अशा कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे सांगितले.

**कायदा व्यवस्थापन विभाग :** राज्य कार्यवाह ॲड. मनीषा महाजन यांनी मागील कार्याचा आढावा घेऊन डॉ. नरेंद्र दाभोलकर खून खटल्याच्या निकालाबाबत सविस्तर माहिती कार्यकर्त्यांना दिली.

प्रकाशन आणि वितरण विभागाचे राज्य कार्यवाह नवल ठाकरे, विज्ञान बोधवाहिनी विभागाचे कार्यवाह भास्कर सदाकळे, विवेक वाहिनीच्या राज्य कार्यवाह प्राचार्य सविता शेटे, कार्यालयीन व्यवस्थापन विभागाचे कार्यवाह उत्तरेश्वर बिराजदार यांनी विभागांची माहिती देऊन पुढील नियोजन सांगितले. निधी व्यवस्थापन विभागाचे राज्य कार्यवाह परेश शहा यांनी एकूण जमाखर्चाची सविस्तर माहिती कार्यकर्त्यांना सांगितली. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या कामकाजाबद्दल उत्तम जोगदंड यांनी सविस्तर माहिती दिली. तीन दिवसाच्या राज्य बैठकीत संघटना अंतर्गत कामाची चर्चा करून एकमताने निर्णय घेण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात संघटनेच्या ३५ वर्षे पूर्तीनिमित्त कार्यक्रम घेण्यात येणार असून त्याची तयारी करण्याचे ठरले. त्यानिमित्ताने संघटनेचा एक आकर्षक सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचे ठरले. महिला व युवा सभासद नोंदणी अभियानास गतिमान करण्याचे ठरले.

राज्य बैठकीचा समारोप ज्येष्ठ साहित्यिक आणि महा.अंनिसचे राज्य उपाध्यक्ष उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाला. समारोप प्रसंगी बोलताना उत्तम कांबळे म्हणाले, ''महा.अंनिस ही स्वयंप्रेरणेतून तयार झालेली संघटना आहे. गेली ३५ वर्षे संघटितपणे विवेकी मूल्यविचार रुजवले जात आहेत. तथागत गौतम बुद्धांच्या 'अत्त दीप भव' प्रमाणे कार्यकर्ते निःस्वार्थी भावनेने काम करत आहेत. अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य कधीही न संपणारे काम आहे. या चळवळीत तरुणांचा सहभाग वाढवला पाहिजे. अंधश्रद्धा निर्मूलन ही एक समाजाचे समग्र परिवर्तन करणारी चळवळ आहे. आपल्या विचारातून आणि कृतीतून समाजपरिवर्तन करण्याचे काम कार्यकर्ते सातत्याने करत आहे. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष माधव बावगे होते. यावेळी संयोजनात सहभाग घेतलेल्या व्यक्तींचा हस्ते सत्कार करण्यात आला. बैठकीत विशेष सहकार्य केल्याबद्दल दीपिका शिंदे व वनिता बनसोडे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. तीन दिवसांच्या बैठकीत संघटना अंतर्गत विविध विभागांचा आढावा घेऊन पुढील कार्यक्रमांचे, उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. तसेच संघटना अंतर्गत वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करून एकमताने निर्णय घेण्यात आले. राज्य कार्यकारिणीच्या कार्यक्रमस्थळी प्रा. एन. डी. पाटील सभागृह, क्रांतिसिंह नाना पाटील विचारमंच, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुस्तक प्रदर्शन, ॲड. के.डी. शिंदे नोंदणी कक्ष असे नामकरण करण्यात आले होते. ॲड. सुहास माळी, डॉ. राम घुले, डॉ. काशीलिंग गावडे, प्रा. भुषण जाधव, शुभांगी शिरसे, राजेंद्र मोटे, योगेश कुदळे, प्रशांत इंगळे, अमोल चौगुले, बजरंग सपकाळ, निखिल शिंदे, अनन्या कुडाळकर, संहिता पाटील, तेजस शिंदे, आदित्य कुडाळकर, जिजाई गंगनमाले, प्रज्ञा व शार्दुल घुले, नीलम पन्हाळे, प्रशिक पाटील आदींनी विशेष परिश्रम घेतले. 'हम होंगे कामयाब' हे गीत घेऊन कार्यक्रमाचा समारोप झाला. ●

## इस्लामपूरात अंनिसच्या वतीने संविधान जनजागृती फेरी




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणीचे तीन दिवसीय अधिवेशन झाले. या अधिवेशनानिमित्त इस्लामपूर शहरातून संविधान जनजागृती फेरी काढण्यात आली. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी जनजागृतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या या संविधान फेरीत महाराष्ट्रातील ३३ जिल्ह्यांतील कार्यकर्ते सहभागी झाले होते. डॉ. एन. डी. पाटील सभागृहापासून सुरू झालेली संविधान फेरी शाहूनगर, वाय. सी. कॉलेज, न्यायालय आवार, पोस्ट ऑफिस, गांधी चौक ते यल्लमा चौकातून तहसील कार्यालयासमोर आली. तिथे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादनानंतर फेरीचे सभेत रूपांतर झाले. यावेळी कार्यकर्त्यांनी प्रबोधनाची गीते सादर केली. प्रबोधनाचे फलक हाती घेतलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, संजय बनसोडे यांचे भाषण झाले.

## सांस्कृतिक क्षेत्रातल्या अंधश्रद्धांवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता




अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही परिवर्तनाची चळवळ आहे. सामाजिक अंधश्रद्धाबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातल्या अंधश्रद्धांचे स्वरूप अधिक धोकादायक आहे. अंनिसच्या चळवळीने आता सांस्कृतिक क्षेत्रातल्या अंधश्रद्धावर लक्ष केंद्रित करायला हवे, असे प्रतिपादन श्रमिक मुक्ती दलाचे ज्येष्ठ नेते डॉ. भारत पाटणकर यांनी केले. इस्लामपूर येथे महा. अंनिसच्या तीन दिवसीय अधिवेशनाच्या अभ्यास शिबिरात ते बोलत होते. राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे अध्यक्षस्थानी होते. पाटणकर यांच्या हस्ते अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे प्रकाशन झाले. पाटणकर म्हणाले, ''काळानुरूप अंधश्रद्धांचे स्वरूप आणि त्यांना बळी पडणाऱ्या समाजाचे स्वरूपही बदलत निघाले आहे. यामुळे अंनिसच्या चळवळीने व्यापक व्हायला हवे. यावेळी लक्ष्यवेधी आणि शतकवीर पुरस्कारांचे वितरण झाले. माधव बावगे यांनी मनोगत व्यक्त केले. ठकसेन गोराणे, संजय बनसोडे, प्रा. डॉ. नितीन शिंदे उपस्थित होते. उत्तम जोगदंड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एकनाथ पाटील यांनी परिचय करून दिला. डॉ.एस.बी. माने यांनी सूत्रसंचालन केले. प्रल्हाद मिस्त्री यांनी आभार मानले.

---

## समाजाच्या निकोप वाढीसाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ गरजेची



आपल्या संतांनी आणि समाजसुधारकांनी फार मोठा धोका पत्करून चुकीच्या चालीरीती, रूढी-परंपरा, अज्ञान आणि अंधश्रद्धेवर जोरदार प्रहार केलेला आहे. समाजाच्या निकोप वाढीसाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ जोपासायला हवी, अशी भावना माजीमंत्री, आमदार जयंत पाटील यांनी व्यक्त केली. इस्लामपूर येथे महाराष्ट्र अंधश्रद्धानिर्मूलन समितीच्या विस्तारित राज्य कार्यकारणीच्या बैठकीत ते बोलत होते. समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य उपाध्यक्ष प्रा. शामराव पाटील उपस्थित होते. यावेळी जादूटोणा विरोधी कायद्याच्या चित्रमय पुस्तिकेचे प्रकाशन जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जयंत पाटील म्हणाले, ''आधुनिक काळातही अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची उपयुक्तता आहे. विवेकी समाजनिर्मितीसाठी अंनिसचे योगदान उल्लेखनीय आहे. समाजातील वेगवेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक चळवळी टिकल्या पाहिजेत. समाजातील लोकांनी चळवळीच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. संजय बनसोडे यांनी स्वागत केले. प्रा.प्रमोद गंगनमाले यांनी आभार मानले. यावेळी प्रा. बी. आर. जाधव, प्रा.एल. डी. पाटील, निलेश कुडाळकर, प्रा. राम घुले यांच्यासह राज्यातून आलेले कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंनिसला बळ देणे ही समाजाची जबाबदारी




अंधश्रद्धा समाजाला मारक असतात. शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीला त्या अडसर ठरतात. निकोप समाजासाठी अशा प्रथा-परंपरा विरोधातील लढाई दीर्घकाळची असते. स्वयंऊर्जा घेऊन लढणाऱ्या या कार्यकर्त्यांना बळ देणे ही समाजाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी केले. इस्लामपूर येथे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या तीन दिवसीय विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत समारोप सत्रात ते बोलत होते. राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे अध्यक्षस्थानी होते. कांबळे म्हणाले, ''अंधश्रद्धांचे स्वरूप काळानुरूप बदलत आहे. शिक्षित वर्गात अंधश्रद्धेचे प्रमाण मोठे आहे. खेड्यापाड्यातला सामान्यवर्गही त्याचे अनुकरण करतो आहे. त्यामुळे ही शोषणमुक्त लढाई सोपी राहिलेली नाही. उद्याच्या काळात अंनिसच्या कार्यकर्त्यांना आपल्या लढाईची दिशा आणि व्यूहरचना बदलावी लागेल.'' माधव बावगे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रारंभी संजय बनसोडे यांनी स्वागत केले. यावेळी राज्य उपाध्यक्ष प्रा. शामराव पाटील, प्रा. बी. आर. जाधव, जगदीश काबरे, डॉ. ठकसेन गोराणे, शहाजी भोसले, विनायक सावळे, कृष्णात कोरे, सुधाकर काशीद, विजय परब, रुक्साना मुल्ला आदी उपस्थित होते. प्रा. प्रमोद गंगनमाले यांनी तीन दिवसांच्या बैठकीचा आढावा सादर केला. डॉ. राम घुले यांनी अधिवेशनाचे सूत्रसंचालन केले. प्रा. एस. बी. माने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

## लोकशाहीचा अर्थ सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्याची गरज



राष्ट्रवाद ही खूप व्यापक संकल्पना आहे. धर्म, जात, प्रांत, भाषा, भूगोल आणि संप्रदाय अशा अनेक बाबतीत कमालीची विविधता आणि भिन्नता असूनही भारतासारखा बहुसांस्कृतिक देश एकात्मता जपत आला आहे. संविधान हा या एकात्मतेचा मूलभूत पाया आहे. मात्र आज सत्तेच्या बळावर राष्ट्रवादाचा संकुचित अर्थ लावला जातो आहे. देशाच्या एकसंघतेसमोर आव्हान निर्माण केले जाते आहे. त्यामुळे लोकशाही धोक्यात आली आहे. अशा वेळी लोकशाहीचा खरा अर्थ सामान्य माणसांपर्यंत पोहोचवण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले. महाराष्ट्र अंधश्रद्धानिर्मूलन समितीच्यावतीने इस्लामपूर येथे संपन्न झालेल्या अंनिसच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या तीन दिवसीय बैठकीत 'भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्राचार्य आर.डी.सावंत कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. अंनिसचे राज्यउपाध्यक्ष शामराव पाटील, महात्मा फुले शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष ॲड.एन.आर.पाटील, वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव ॲड.धैर्यशील पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी ॲड.सुखदेव माळी, डॉ. अरुण कोलप, डॉ.राहुल मोरे, उद्योजक श्रीनिवास आठवले, प्रा.डॉ.प्रमोद गंगनमाले, प्रा.डॉ.सुदाम माने, श्रीमती सुरेखा शिंदे, शरद साळुंखे, पूजा ऋषिराज जाधव यांना सन्मानित करण्यात आले. महा.अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे आणि प्राचार्य आर.डी.सावंत यांची भाषणे झाली. प्रा. बी. आर. जाधव यांनी स्वागत केले. संजय बनसोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.डॉ.तृप्ती थोरात यांनी सूत्रसंचालन केले, तर एस.बी.माने यांनी आभार मानले. यावेळी अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.



# पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण

वृत्तांत

**प्रल्हाद मिस्त्री ।** नाशिक
९४२०२६१८२९

## पुस्तक प्रकाशन सोहळा

संघटनेच्या कार्यकर्त्यांचे साहित्य किंवा संघटनेने प्रसारित करावयाचे साहित्य यांचे प्रकाशन विवेक जागर प्रकाशनाकडून केले जाते. इस्लामपूर येथे पार पडलेल्या विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत संघटनेने प्रसारित करावयाच्या 'जादूटोणाविरोधी कायद्याच्या चित्रमय पुस्तिके'च्या तिसऱ्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन; तसेच प्रा. सुशील मेश्राम यांनी संपादित केलेल्या 'बुद्धिझम आणि अवयवदान, देहदान' या पुस्तकाचे प्रकाशन मा. आमदार जयंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



पुस्तकांच्या प्रकाशनप्रसंगी आमदार जयंत पाटील यांनी म्हटले की, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी ब्रिटिश काळातसुद्धा असे कायदे ब्रिटिशांनी केलेले होते. आताही जादूटोणाविरोधी कायदा व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा झालेला आहे. आपल्या संतांनी आणि समाजसुधारकांनी फार मोठा धोका पत्करून चुकीच्या चालीरीती, रूढी-परंपरा, अज्ञान आणि अंधश्रद्धांवर प्रहार केलेला आहे. समाजाच्या निकोप वाढीसाठी, विवेकी समाजाच्या निर्मितीसाठी अंनिसचे योगदान उल्लेखनीय असून, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ जोपासायला हवी. समाजातील वेगवेगळ्या सामाजिक चळवळी टिकल्या पाहिजेत. समाजातील लोकांनी या चळवळींच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.' असे विचार मांडून प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन विकासासाठी व्याख्याने देणे गरजेचे असून, शिक्षकांची प्रशिक्षणं घेण्याच्या उपक्रमाची त्यांनी आपल्या भाषणात प्रशंसा केली. यावेळी संघटनेच्या वतीने राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी म्हटले की, दोन्ही कायदे झाले; पण त्यांचे नियम अद्याप झालेले नाहीत. याबद्दल शासनाने तातडीने नियम तयार करून जनतेत त्यांचे प्रसारण व्हावे, अशी मागणी बनसोडे यांनी महाराष्ट्र अंनिसच्या वतीने आमदार जयंत पाटील यांच्या उपस्थितीत मांडली. या प्रसंगी राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे, राज्य उपाध्यक्ष प्रा. शामराव पाटील, प्रा. बी. आर. जाधव, डॉ. राम घुले, डॉ. सुदाम माने उपस्थित होते. डॉ. प्रमोद गंगनमाले यांनी आभार व्यक्त केले.

## लक्ष्यवेधी पुरस्कार वितरण

महाराष्ट्र अंनिसचे व्यापक समाजपरिवर्तनाचे कार्य, त्याचा प्रचार आणि प्रसार कोणत्याही शासकीय मदतीशिवाय केवळ लोकसहभागातून होत असतो. त्यासाठी संघटनेचे आर्थिक स्तंभ असणारे आमचे हजारो हितचिंतक आणि क्रियाशील कार्यकर्ते, देणगीदार, जाहिरातदार आणि वर्गणीदार यांचा परस्पर संवाद एका जाळ्याच्या माध्यमातून होतो. ते जाळे विणणारे आमचे राज्यभरातील आणि अलीकडे काही राज्याबाहेरीलसुद्धा शेकडो कार्यकर्ते या जाळ्यातील बिंदू जोडत असतात आणि त्यातून संघटना चालविण्यासाठीचा निधी जमा करीत असतात. जे कार्यकर्ते व्यक्तिगतरीत्या किंवा शाखेच्या स्तरावर निधी संकलनाचे एक विशिष्ट लक्ष्य पार करतात, तसेच जे कार्यकर्ते 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या मासिकाचे १०० पेक्षा अधिक वर्गणीदार करण्याचे लक्ष्य गाठतात त्यांचा गौरव करणे संघटना आपले कर्तव्य मानते. संघटनेच्या वतीने अंनिप संपादक मंडळाकडून अशा सर्व कार्यकर्त्यांचा आणि शाखांचा

'लक्ष्यवेधी' पुरस्कार देऊन गौरव केला जातो. इस्लामपूर येथे झालेल्या संघटनेच्या विस्तारित राज्य कार्यकारिणीच्या बैठकीच्या दुसऱ्या दिवशी, दि. १ जून, २०२४ रोजी दुसऱ्या सत्रात पार पडलेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून श्रमिक मुक्ती दलाचे ज्येष्ठ नेते डॉ. भारत पाटणकर होते. निधी संकलनात व्यक्तिगत लक्ष्य गाठणाऱ्यांमध्ये ४१ कार्यकर्ते आहेत, तर शाखा स्तरावरील संकलनात १५ शाखा आहेत. शतकवीरांत ११ कार्यकर्त्यांचा समावेश आहे. या सर्व कार्यकर्त्यांना प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह आणि पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. भारत पाटणकर यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हटले की, 'सामाजिक अंधश्रद्धांबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रातल्या अंधश्रद्धांचे स्वरूप अधिक धोकादायक असल्याने अंनिस चळवळीने आता त्या अंधश्रद्धांवर देखील लक्ष केंद्रित करून काम करावे'. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुदाम माने यांनी, तर प्रल्हाद मिस्त्री यांनी आभार मानले.

●

## लक्ष्यवेधी कार्यकर्ता पुरस्कार-२०२४


शोभा बोऱ्हाडे (जळगाव)


भिमराव दाभाडे (जळगाव)


दिगंबर कट्यारे (जळगाव)


ॲड. भरत गुजर (जळगाव)


पी. एम. जाधव (चंद्रपूर)


बब्रुवान गोमसाळे (लातूर)


रुकसाना मुल्ला (लातूर)


निर्भय कोरे (लातूर)


अनिल दरेकर (लातूर)


निर्मला फुलगावकर (रायगड)


नितीन राऊत (रायगड)


पूजा डांबरे (रायगड)


करुणा तांडेल (रायगड)


मनोहर तांडेल (रायगड)


छाया धनवे (ठाणे)


संदेश बालगुडे (ठाणे)


डॉ. सविता शेटे (बीड)


सुधीर निंबाळकर (ठाणे)


धर्मराज चवरे (सोलापूर)


हर्षल जाधव (कोल्हापूर)


विठ्ठलराव कोठारे (गडचिरोली)


संदीप गिरासे (धुळे)


डॉ. सुषमा बसवंत (ठाणे)


गौरव आळणे (नागपूर)


हरिदास तम्मेवार (लातूर)


विष्णुदास लोणारे (भंडारा)


विजय खंडेराव (नाशिक)


राजेंद्र मोटे (सांगली)


एम. डी. जाधव (सांगली)


बजरंग संकपाळ (सांगली)


मुकुंद देसाई (ठाणे)


डॉ. मंजुषा देशमुख (वर्धा)


सारिका डेहनकर (वर्धा)


वसंत वळवी (नंदूरबार)


शितल वसावे (नंदूरबार)


संतोष माळी (नंदूरबार)


प्रवीण वाघ (नंदूरबार)


हंसराज महाले (नंदूरबार)


बाळासाहेब घस्ते (पुणे)


अतुल सव्वाखंडे (पुणे)


डॉ. टी. आर. गोराणे (नाशिक)

## लक्ष्यवेधी शाखा पुरस्कार-२०२४

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : जामनेर, जि. जळगाव

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : ऊर्जानगर, जि. चंद्रपूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : नाशिक शहर जि. नाशिक

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : लातूर, जि. लातूर

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : इस्लामपूर, जि. सांगली

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : अलिबाग, जि. रायगड

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : पनवेल, जि. रायगड

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : शिंदखेडा, जि. धुळे

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : वर्धा, जि. वर्धा

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : नंदुरबार, जि. नंदुरबार

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : शहादा, जि. नंदुरबार

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : पिंपरी चिंचवड जि. पुणे

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : गडचिरोली, जि. गडचिरोली

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : घाटकोपर, जि. मुंबई

अध्यक्ष/कार्याध्यक्ष
शाखा : जळगाव, जि. जळगाव

# शतकवीर कार्यकर्ता पुरस्कार-२०२४



**शिवराम मोंगरकर** (गडचिरोली)



**लहू रामटेके** (गडचिरोली)



**गणपती चौधरी** (गडचिरोली)



**मुकेश कापुरे** (नंदूरबार)



**संजय शेंडे** (नागपूर)



**सुर्यकांत खनके** (चंद्रपूर)



**अरुण भोसले** (वर्धा)



**सुर्यकांत आगळे** (नंदूरबार)



**विजय बोड्रे** (नंदूरबार)



**रायसिंग पाडवी** (नंदूरबार)



**आसिफ शौकत अली सय्यद** (गडचिरोली)

---

**(पृष्ठक्रमांक १७ वरून)**

महाराष्ट्रभरातल्या सर्व डाव्या पुरोगामी चळवळींना एकमुखी नेतृत्व देण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये होते. छोट्या मोठ्या पुरोगामी चळवळींचे ते आधारवड होते. त्यांच्या जाण्याने पुरोगामी चळवळींची अपरिमीत हानी झाली आहे. चळवळींच्यादृष्टीने आजचा काळ सर्वार्थाने कठीण काळ आहे. अनेक सामाजिक प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक तीव्र होत आहेत आणि त्यासाठीच्या विधायक संघर्षाचा अवकाश कमालीचा संकुचित होत निघाला आहे. या कठीण काळात भावी पिढ्यांच्या भवितव्यासाठी त्यांच्या भरण-पोषणासाठी त्यांच्या विचारकार्याचे जतन करणे आवश्यक आहे. त्यामधूनच उद्याच्या चळवळींच्या यशाचे शास्त्र आणि शस्त्र विकसित होणार आहेत. त्यांचे विचार उद्याच्या अनेक पिढ्यांना दीपस्तंभासारखा प्रकाश दाखवत राहतील. संघर्षांची प्रेरणा देत राहतील.

●

---

**अभिनंदन**





**प्रा. विजयकुमार जोखे** यांच्या 'प्रतिसरकार' या पुस्तकाला दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल महा.अंनिसच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक

**अभिनंदन**



**राहुल मुळीक**, वाटेगाव (जि. सांगली) यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामासाठी पंचवीस हजार रुपये देणगी दिल्याबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार.



# महा. अंनिसची खबरबात



**अनिल शोभना वसंत ।** पालघर
९८२३२८०३२७

## चमत्कार सादरीकरण व भांडाफोड शिबिर

**वर्धा :** वैज्ञानिक युगातही मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा समाजामध्ये असलेल्या आपल्याला दिसतात. अशा परिस्थितीमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या विचारांची खरंच खूप गरज आहे. युवा वर्गाने डॉ. नरेंद्र दाभोलकरांचे विचार आत्मसात करायला हवे, त्याप्रमाणे कृती करायला हवी, असे मार्गदर्शन मुरलीधर बेलखोडे यांनी केले. महा. अंनिस जिल्हा व शहर शाखा वर्धा यांच्याद्वारे दि.१९ मे रोजी बोलका ऑक्सिजन पार्क, वर्धा येथे 'चमत्कार



सादरीकरण व भांडाफोड' शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये अमरावती, यवतमाळ आष्टी, कारंजा तसेच वर्धा जिल्ह्यातील एकूण पंचवीस युवक-युवतींचा समावेश होता. उद्घाटन सत्रानंतर डॉ. हरिष पेटकर यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन सत्र घेतले. तिसऱ्या सत्रामध्ये डॉ. माधुरी झाडे यांनी 'श्रद्धा आणि अंधश्रद्धा' हा विषय मांडणी करताना श्रद्धा ही कशाप्रकारे स्थळ, काळ आणि व्यक्तिसापेक्ष असते याची विविध उदाहरणे दिली. चौथ्या सत्रामध्ये अरूण भोसले यांनी बुवाबाजी संदर्भातील संघर्ष आणि अंनिसची भूमिका मांडली. शिबिराच्या पाचव्या सत्रामध्ये प्रशिक्षणार्थींना विविध प्रयोगांचे प्रशिक्षण देण्यात आले. समारोप सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी या शिबिरात येण्यामागचा उद्देश सफल झाल्याचे तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामांमध्ये स्वतःला जुळवून घ्यायला आवडेल, असेही मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. मंजुषा देशमुख यांनी सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रास्ताविक ॲड. कविता राठोड यांनी, तर आभार रोहिणी गाढे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता गजेंद्र सुरकार, सुनील ढाले, प्रकाश कांबळे, निखिल जवादे, डॉ. तुळशीराम राठोड, कुंदा वैद्य, गझल यांनी अथक परिश्रम घेतले.

## वैज्ञानिक दृष्टिकोन शिबिर

**वर्धा :** किशोरवयीन मुलांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा यासाठी महा.अंनिस वर्धा जिल्हा तसेच नई तालीम शिक्षण समिती यांच्यामार्फत शिबिराचे आयोजन अहिंसा कुटीमध्ये करण्यात आले होते. यावेळी विविध वयोगटातील ५० विद्यार्थ्यांनी शिबिरासाठी उपस्थिती लावली. सकाळी ९ ते ५ पर्यंत चाललेल्या या एक दिवसीय शिबिरात मुलांना सामाजिक विज्ञान पर्यावरण, वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्पविज्ञान, विश्वाची व माणसाची निर्मिती, चमत्कार व त्यामागील विज्ञान कचऱ्यातून कला अशा विविध विषयांतून भरपूर खेळ व गीते घेऊन हे शिबिर पार पाडले. यावेळी मार्गदर्शक म्हणून प्रभाकर पुसदकर, किरणताई उल्हास जाजू, गजेंद्र सुरकार, अरूण भोसले, निखील जवादे, प्रकाश कांबळे उपस्थित होते. तसेच अध्यक्षस्थानी सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष आशाताई बोथरा व प्रमुख पाहुणे मंत्री विजय तांबे उपस्थित होते. सूत्रसंचालन भाग्यश्री उगले, तर आभार सुनील ढाले यांनी केले. शिबिरासाठी मंजुषा देशमुख, सारिका डेहणकर, द्वारका इमडवार, युगंधरा, माधुरी झाडे, हरिष पेटकर, शंकर श्रीरामे, रोहन आदेवार, विशाल कांबळे आदीं कार्यकर्ते उपस्थित होते.



**सिन्नर :** महा.अंनिसच्या वतीने वैज्ञानिक दृष्टिकोन व चमत्कार प्रात्यक्षिक सादरीकरण शिबिर उत्साहात संपन्न



झाले. यावेळी राज्य अंनिसचे प्रधानसचिव डॉ. टी.आर. गोराणे, जिल्हा पदाधिकारी महेंद्र दातरंगे, नितीन बागुल यांनी प्रात्यक्षिके सादर केली. सिन्नरचे शाखाप्रमुख हरिभाऊ तांबे, प्रधानसचिव राजेंद्र मिठे, कार्याध्यक्ष दीपक भालेराव, प्रमोद काकडे, बस्तीराम कुंदे, राहुल पगारे, महामित्र दत्ता वायचळे, बापू चतुर, जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.श्यामसुंदर झळके आदींनी शिबिर यशस्वितेसाठी प्रयत्न केले. सुमारे ३५ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले.

**पाक्षिक बैठक**

**सानपाडा :** शाखेची पाक्षिक बैठक, सानपाडा येथे पार पडली. त्यावेळी राजेंद्र पंडित यांनी एका चमत्काराचे प्रात्यक्षिक करून दाखवले. चळवळीचे गीत व विद्यार्थ्यांच्या अंधश्रद्धा यावर एप्रिल २०२४ च्या अंकातील लेखाचे वाचन केले. नवी मुंबई जिल्ह्याचे कार्याध्यक्ष अशोक निकम, सानपाडा शाखेचे प्रधानसचिव कॅ. सी. जे. लेपांडे, ए. एच. शाह, राजन जाधव आदी उपस्थित होते.

**नूतन कार्यकारिणी गठित**

**नवेगाव (रै) गडचिरोली :** दि. २९/०५/२०२४ रोजी चामोर्शी तालुक्यातील नवेगाव (रै) येथील ग्रामपंचायत सभागृहात महा. अंनिसची कार्यकारिणी गठित करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी उपसरपंच दिनकर दुधबडे, प्रमुख पाहुणे म्हणून तंटामुक्त समितीचे अध्यक्ष पांडुरंग भांडेकर, ग्रामपंचायत सदस्य माधव खोबै, तर मार्गदर्शक म्हणून महा. अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पाचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर, जिल्हा बुवाबाजी संघर्ष समिती प्रमुख प्रशांत नैताम, गडचिरोली शहर शाखेचे अध्यक्ष लहुजी रामटेके, कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर, प्रधानसचिव हरिदास कोटरंगे, सदस्य समीर शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात चळवळीचे गीत सादर करून करण्यात आली. प्रशांत नैताम यांनी महा. अंनिसची भूमिका मांडली तर विलास निंबोरकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन समितीची गरज का आहे यावर विस्तृतपणे माहिती दिली. सभेमध्ये रामचंद्र सातपुते यांनी मनातील काही शंका व्यक्त केल्या. त्याचे स्पष्टीकरण विविध उदाहरणे देऊन करण्यात आले. सर्वांच्या अनुमतीने कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

अध्यक्ष – डंबाजी खोडवे, उपाध्यक्ष – माधव खोबे, कार्याध्यक्ष – पांडुरंग भांडेकर, प्रधानसचिव – दिनकर दुधबडे, बुवाबाजी संघर्ष प्रमुख – जिजाबाई उडाण, विविध उपक्रम विभाग प्रमुख – लताबाई गेडाम, सदस्य – निशाताई भांडेकर, प्रतिभा गव्हारे, रंजना कुणघाडकर, युवराज शिडाम, रामचंद्र सातपुते. यावेळी डॉ. शिवनाथ कुंभारे, पंडित पुडके, देवाजी सोनटक्के, जिल्हा अध्यक्ष रोहिदास राऊत, जिल्हा उपाध्यक्ष चोपाराम कांबळे, कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, जिल्हा प्रधानसचिव पुरुषोत्तम ठाकरे, प्रा. विलास पारखी, महिला सहभाग कार्यवाह सौ. सुधाताई चौधरी, गोविंदराव ब्राह्मणवाडे आदी उपस्थित होते.

**मेडपल्ली :** दि. २९ मे, २०२४ रोजी अहेरी तालुक्यातील मेडपल्ली येथे महा.अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर व विठ्ठलराव कोठारे (जिल्हा कार्याध्यक्ष) याच्या मार्गदर्शनात शाखा गठित करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष चिकाटे (कार्याध्यक्ष, आलापल्ली) व प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी कोंडागोर्ला (प्रधानसचिव आलापल्ली) उपस्थित होते. संतोष चिकाटे यांनी संघटना आणि संघटनेची भूमिका यावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच शाखा सतत क्रियाशील ठेवण्याचे आवाहन देखील केले. याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकारी यांना अंनिप मासिक देऊन स्वागत करण्यात आले.

गावाने मागील १२ वर्षांपासून दारूबंदी अभियान राबवून एक नवा आदर्श निर्माण केला आहे. अध्यक्ष – भगवान मडावी, उपाध्यक्ष – मारोती पेंदाम, कार्याध्यक्ष – निलेश वेलादी, प्रधानसचिव – सुरज मडावी, बुवाबाजी संघर्ष कार्यवाह – नामदेव मडावी, विविध उपक्रम कार्यवाह – महेश वेलादी. यावेळी गडचिरोली जिल्हा शाखेचे ज्येष्ठ

सल्लागार डॉ. शिवनाथ कुंभारे, पंडित पुडके, देवाजी सोनटक्के, जिल्हा अध्यक्ष रोहिदास राऊत, जिल्हा उपाध्यक्ष चोपाराम कांबळे, कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, जिल्हा प्रधानसचिव पुरुषोत्तम ठाकरे, प्रा. विलास पारखी, बुवाबाजी संघर्ष प्रमुख प्रशांत नैताम, महिला सहभाग कार्यवाह सौ. सुधाताई चौधरी, गोविंदराव ब्राह्मणवाडे आदी उपस्थित होते.

**जिंजगाव :** भामरागड तालुक्यातील जिंजगाव येथे महा. अंनिसची कार्यकारिणी गठित यावेळी मनोज मडावी



यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. सिताराम मडावी यांनी आलापल्ली शाखेचे कार्याध्यक्ष संतोष चिकाटे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली गावगाड्यातील अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी संघटनेची गरज लक्षात घेऊन शाखा निर्माण करण्याचे गावातील काही प्रमुख लोकांना सांगितले. पुढीलप्रमाणे अविरोध कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

अध्यक्ष - मनोज पोरतेट, उपाध्यक्ष - विलास मडावी, कार्याध्यक्ष - सिताराम मडावी, प्रधानसचिव - लक्ष्मण मडावी, बुवाबाजी संघर्ष प्रमुख - राकेश मडावी, विविध उपक्रम विभाग-भगवान मडावी, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्प - राजेश तलांडे, युवा सहभाग कार्यवाह - गोविंद इष्टाम. यावेळी गडचिरोली जिल्हा शाखेचे ज्येष्ठ सल्लागार डॉ. शिवनाथ कुंभारे, पंडित पुडके, देवाजी सोनटक्के, वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर, जिल्हा अध्यक्ष रोहिदास राऊत, जिल्हा उपाध्यक्ष चोपाराम कांबळे, कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, जिल्हा प्रधानसचिव पुरुषोत्तम ठाकरे, प्रा. विलास पारखी, बुवाबाजी संघर्ष कार्यवाह प्रशांत नैताम, महिला सहभाग कार्यवाह सौ. सुधाताई चौधरी, गोविंदराव ब्राह्मणवाडे आदी उपस्थित होते.

**अभिवादन**

**सिन्नर :** येथील विजयनगरमधील बसवेश्वर चौकात महा.अंनिस सिन्नर शाखेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त (१० मे) अभिवादन करण्यात आले. अंनिसचे कार्याध्यक्ष डॉ. श्यामसुंदर झळके यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या सामाजिक जीवनकार्याची माहिती दिली. महामित्र दत्ता वायचळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ.जी.एल.पवार, डॉ.आर.टी.जाधव, डॉ.ओझा, अविनाश आस्टुरे, ॲड.आत्माराम उगले, सोमनाथ लोहारकर, जगदीश च व्हाण उपस्थित होते.

**घोट :** शाखेच्या वतीने बुद्धपौर्णिमा साजरी करण्यात आली आणि शाखा पदाधिकारी यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्धांना पुष्पहार करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर त्रिशरण, पंचशील व अष्टांगिक मार्गचे सामूहिक वाचन करून ते विचार समाजातल्या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करू अशी प्रतिज्ञा घेतली. महा.अंनिसचे जिल्हा उपाध्यक्ष प्राचार्य चोपाराम कांबळे, घोट शाखेचे कार्याध्यक्ष आसिफ सय्यद,




उपाध्यक्ष हेमंत उपाध्ये, बाबुराव भोवरे, प्राचार्य नागोसे, डॉ. उपाध्ये, रवी सोमनकर, भैय्याजी दुधबावरे, रंगारी आदी उपस्थित होते.

**गडचिरोली :** अखंड विश्वाला दया, शांतीची शिकवण देणारे तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करून शाखा गडचिरोली तर्फे बुद्धपौर्णिमा निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी महा.अंनिसचे वैज्ञानिक जाणिवा शिक्षण प्रकल्पचे राज्य सहकार्यवाह विलास निंबोरकर, जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठलराव कोठारे, जिल्हा प्रधानसचिव पुरुषोत्तम ठाकरे, शहर शाखेचे कार्याध्यक्ष उपेंद्र रोहनकर, प्रधानसचिव हरिदास कोटरंगे, सदस्य रमेश इंदुरकर, शंकर पाटील, भिवाजी खोब्रागडे, जुनासूर्ला, साहील पिसे, हिरापूर आदी उपस्थित होते. ●

# प्रबोधन संवाद यात्रा

सातपुड्यातील डाकीण प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महा.अंनिस नंदूरबार जिल्ह्याच्या वतीने तीन दिवसीय जिल्हास्तरीय डाकीण प्रथा विरोधी प्रबोधन संवाद यात्रा आयोजित करण्यात आली. धडगाव, अक्कलकुवा आणि मोलगी पोलीस ठाण्यात मागील महिनाभरात सात ते आठ डाकीण प्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. डाकीण प्रकरणांत झालेली वाढ यासंदर्भात प्रबोधन व संवादाची भूमिका घेऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने डाकीण प्रथा विरोधी प्रबोधन संवाद यात्रा काढण्यात आली. या प्रबोधन संवाद यात्रेच्या निमित्ताने जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक, प्रशासनातील अधिकारी, पोलीस पाटील, स्थानिक संस्थांचे लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संस्था-संघटना यांच्या भेटी घेऊन त्यांना डाकीण प्रश्नाची दाहकता लक्षात आणून देण्यात आली. डाकीण प्रथा निर्मूलनासाठी सर्व घटकांना सोबत घेऊन या प्रश्नावर व्यापक भूमिका ठरवण्याचा या यात्रेमागील उद्देश होता. पीडित महिलांशी संवाद, कायदेशीर मदत करणे व त्यांच्या सामाजिक पुनर्वसनासाठी मदत करणे इत्यादी बाबी या यात्रेअंतर्गत घेण्यात आल्या. तळोदा येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात या डाकीण प्रबोधन संवाद यात्रेचे पोलीस पाटीलांची परिषद घेवून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी नायब तहसीलदार निशा नाईक, सहायक प्रकल्प अधिकारी उत्तम राऊत, पोलीस उपनिरीक्षक धर्मेंद्र पवार, गटशिक्षण अधिकारी शेखर धनगर, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. डी. बी. शेंडे, जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, प्रधानसचिव वसंत वळवी, सोशल मीडिया विभागाचे राज्य कार्यवाह किर्तीवर्धन तायडे, तळोदा उपाध्यक्ष तारा मराठे, सिद्धार्थ महिरे, डॉ. किशोर सामुद्रे, पोलीस पाटील संघटनेचे बापू पाटील, बबन इंद्रजित, सावित्री पाडवी आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते पाण्याद्वारे दिवा प्रज्वलित करून प्रबोधन यात्रेचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या उद्घाटन मनोगतक पोलीस उपनिरीक्षक धर्मेंद्र पवार यांनी समाजातून डाकीण प्रथा निर्मूलनासाठी पोलीस पाटलांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. गटशिक्षणाधिकारी धनगर यांनी विद्यार्थ्यांच्या



मनात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी शिक्षणाद्वारे प्रयत्न करून समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी प्रबोधन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. उत्तम राऊत यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवनंतर देखील समाजात डाकीणसारख्या अनिष्ट व अघोरी प्रथांवर चर्चा व प्रबोधन करावे लागते, याबाबत खंत व्यक्त केली. प्रास्ताविक राज्य सरचिटणीस विनायक सावळे यांनी केले. डॉ. गोराणे यांनी डाकीण केवळ आदिवासी भागातच नाही तर महानगरांमध्येसुद्धा आढळून येत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन मुकेश कापुरे, यशस्वितेसाठी शाखा कार्याध्यक्ष प्रा. सुनिल पिंपळे, सचिव अमोल पाटोळे, हंसराज महाले, सिद्धेश्वर गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

●

# धार्मिकतेच्या नावाखाली सामाजिक विद्वेषीकरण

त्र्यंबकेश्वर येथील मंदिरामध्ये भाविकांकडून त्यांच्या श्रद्धास्थानाला जो प्रसाद अर्पण केला जातो, त्या प्रसादात अनेकदा वर्ज्य असलेले पदार्थ मिसळले जात असल्याचे प्रकार अनेकदा घडतात. त्यामुळे हिंदू धर्मियांच्या आस्थेला ठेच लागत असून, प्रसादाचे पावित्र्यही अशुद्ध होत आहे. हे पावित्र्य भंग होऊ नये म्हणून प्रसाद विकणाऱ्या दुकानांना काही हिंदुत्ववादी संघटनांकडून ओम सर्टिफिकेट दिले जाणार आहे. दैवताला अर्पण केला जाणारा प्रसाद सात्विक आहे की नाही याची तपासणी केली जाणार आहे. त्यानंतर संबंधितांना सर्टिफिकेट दिले जाणार असल्याची बातमी प्रसारमाध्यमातून झळकली आणि १४ जून २०२४ पासून या प्रसाद शुद्धीकरणाच्या चळवळीला प्रारंभही झाला. मंदिराबाहेर मिळणाऱ्या प्रसादात अनेकदा विधर्मी व्यक्तींद्वारा भेसळ केल्याचे प्रकार समोर आलेले आहेत, असेही बातमीत नमूद आहे. खरं तर, त्रंबकेश्वर हे अनेक धर्मियांचे श्रद्धास्थान आहे. शिवाय सर्वच धार्मिक क्षेत्रांप्रमाणे येथेही धार्मिक क्षेत्राशी निगडित अनेक वस्तूंचा, खाद्यपदार्थांचा व्यवसाय, व्यापार करणारी मंडळी ही विविध जाती, धर्माची आहेत. केवळ आस्तिक असलेल्या हिंदू धर्मियांच्या दुकानदारांनाच ओम सर्टिफिकेट दिले जातील, अशी वल्गनाही या धार्मिक संघटनांच्या प्रतिनिधींनी केली होती. आता आस्तिक कोण आणि नास्तिक कोण हे कशाचे आधारे ठरवणार आणि त्र्यंबकेश्वरमध्ये केवळ हिंदू धर्मियांच्या दुकानदारांनी, व्यापाऱ्यांनीच व्यवसाय करावेत का, असे अनेक प्रश्न या अनुषंगाने निर्माण होतात. राज्यघटनेतील तत्त्वाशी हे विसंगत आहेत. तसेच विधर्मी व्यक्तीने मंदिराबाहेर प्रसादात भेसळ करण्याचे प्रकार घडले आहेत, असे भंपक विधान करून सर्वच भाविक व व्यावसायिक यांच्या मनात परस्परांच्या जात-धर्माबद्दल द्वेष, संशय व संभ्रम बळावण्याची दाट शक्यता आहे. लोकांच्या सुदृढ आरोग्यासाठी अन्नभेसळ प्रतिबंध व अन्नसुरक्षा विभाग तसेच अन्न व औषध प्रशासन (एफ.डी.ए.) या शासनाच्या विभागांमार्फत नियमितपणे केवळ प्रसादच नव्हे, तर सर्वच अन्नपदार्थांची काटेकोर तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शासनाच्या या विभागांनी सतत जागरूक राहून सर्वच धर्मांच्या धार्मिक स्थळांवरील प्रसादासह सर्व ठिकाणी असलेल्या अन्नधान्य, वस्तू, पदार्थांची वारंवार तपासणी करायला हवी आणि दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करायला हवी. अशी मागणी हिंदुत्ववादी संघटनांनी सरकारकडे किंवा अन्नभेसळ प्रतिबंध व अन्नसुरक्षा विभाग; तसेच अन्न व प्रशासन विभाग (एफ.डी.ए.) यांच्याकडे लेखी स्वरूपात करायला हवी होती. महाराष्ट्र अंनिसने त्याचे स्वागतच केले असते. पण तसे काहीही न करता धार्मिकतेच्या नावाखाली प्रसाद शुद्धीकरणाचा बहाणा करून बेकायदेशीरपणे व मनमानीप्रमाणे प्रसादाच्या शुद्धीकरणाचे सर्टिफिकेट व्यावसायिकांना वाटण्याची चळवळ सुरू करणे हे जबरदस्तीने कायदा हातात घेऊन, व्यावसायिकांच्या व्यवसाय स्वातंत्र्यावर गदा आणणारे आणि समाजात धार्मिक द्वेष, संशय पसरवणारे कारस्थान आहे. म्हणून धर्माच्या नावाने कायदा हातात घेणाऱ्या अशा संघटनांच्या जाहीर कार्यक्रमांची वेळीच दखल घेऊन त्यांना कायदेशीर कडक समज देणे, कायद्याच्या कचाट्यात आणणे आवश्यक आहे. तसेच याच प्रकारे अन्य कोणत्याही धर्माच्या धार्मिक संघटनांमार्फत व्यवसायाची सर्टिफिकेट घेऊनच व्यवसाय व व्यापार करावा, अशी बेकायदेशीर बंधने जर लादली जात असतील तर त्यांच्यावरसुद्धा कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र अंनिसचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील, राज्य प्रधानसचिव डॉ. टी. आर. गोराणे, राज्य सदस्य प्रल्हाद मिस्त्री, जिल्हा बुवाबाजी संघर्ष सचिव महेंद्र दातरंगे यांनी एका जाहीर निवेदनाद्वारे मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे केली आहे.



त्र्यंबकला ओम प्रमाणपत्राची सक्ती

प्रसादाचे पाविञ्य राखण्यासाठी उप्रकम

म. टा. वृत्तसेवा, त्र्यंबकेश्वर

मंदिरात अर्पण करण्यात येणाऱ्या प्रसादाचे पावित्र्य, सात्त्विकता आणि शुद्धता अबाधित राहावी, यासाठी हिंदुत्ववादी संघटनांनी पुढाकार घेत प्रसाद विकणाऱ्या दुकानांना 'ओम प्रमाणपत्र' वाटप केले. भगवान त्र्यंबकराजाला सर्वप्रथम प्रमाणपत्र अर्पण केल्यानंतर 'ओम प्रतिष्ठान' संस्थेचे रणजित सावरकर, सिनेनाट्य अभिनेते शरद पोंक्षे, महंत अनिकेतशास्त्री देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. स्थानिक नागरिक, साधूमंडळींनी या उपक्रमाकडे पाठ फिरवली. मात्र, भाजपचे तालुकाध्यक्ष विष्णू दोबाडे, पुरोहित संघाचे अध्यक्ष तथा विश्वस्त मनोज थेटे, विश्वस्त सत्यप्रिय शुक्ल आदी उपस्थित होते.

- स्थानिक विक्रेत्यांमध्ये नाराजी
- 'एफडीए'चे प्रमाणपत्र असताना नवे सर्टिफिकेट
- स्थानिक नागरिक, साधूमंडळींची पाठ

त्र्यंबकेश्वर मंदिरालगत असलेल्या पेढे विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना नाशिक पुरोहित संघाचे अध्यक्ष सतीश शुक्ल यांच्या हस्ते हे प्रमाणपत्र देण्यात आले.

कशासाठी प्रमाणपत्र?

आयोजकांनी प्रसिद्धिमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना, देशात हलाल प्रमाणपत्र देण्यात येत आहे, त्याप्रमाणे यापुढे संपूर्ण देशभरात तीर्थक्षेत्रावर प्रसाद विक्री करणाऱ्यांना ओम प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. हे प्रमाणपत्र ऐच्छिक आहे. त्यासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे. प्रमाणपत्रावर डिजिटल संकेतांक असेल. त्यामुळे त्याची नक्कल करता येणार नाही.

➤ उर्वरित... पान ६

सर्टिफिकेट बेकायदेशीर : अंनिस

मंदिराबाहेर प्रसादात भेसळीचे प्रकार घडले आहेत, असे भंपक विधान करून सर्वच भाविक व व्यावसायिक यांच्या मनात संशय व संभ्रम निर्माण केला जात आहे. सरकारच्या अन्नभेसळ प्रतिबंधक व अन्नसुरक्षा विभागामार्फत नियमितपणे केवळ प्रसादच नव्हे, तर सर्वच अन्नपदार्थांची काटेकोर तपासणी व्हावी, दोषींवर कडक कायदेशीर करायला हवी, अशी मागणी या हिंदुत्ववादी संघटनांनी सरकारकडे किंवा अन्नसुरक्षा विभागाकडे लेखी स्वरूपात करायला हवी होती. मात्र, तसे न करता प्रसाद शुद्धीकरणाच्या नावाखाली बेकायदेशीरपणे सर्टिफिकेट वाटले जात आहे. या कार्यक्रमांची वेळीच दखल घेऊन त्यांना कायदेशीर कडक समज देणे आवश्यक असल्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष अविनाश पाटील व राज्य प्रधान सचिव डॉ. टी. आर. गोराणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

•

# विस्तारीत राज्य कार्यकारीणी बैठक : इस्लामपूर (सांगली) : क्षणचित्रे

## जिल्हा आणि विभागाचे अहवाल सादर करताना




रत्नागिरी जिल्ह्याचा अहवाल मांडताना संदिप गोवळकर




धाराशिव जिल्ह्याचा अहवाल मांडताना अरविंद शिंदे




बीड जिल्ह्याचा अहवाल मांडताना प्रदिप चव्हाण




पालघर जिल्ह्याचा अहवाल मांडताना धनंजय लोखंडे




नवी मुंबई जिल्ह्याचा अहवाल मांडताना राजेंद्र पंडीत



मुंबई जिल्ह्याचा अहवाल मांडताना नंदना गजभिये




प्रशिक्षण विभागाचा अहवाल मांडताना सुधाकर तट




बेळगाव शाखेचा अहवाल मांडताना शंकरराव चौगुले

ISSN : 2584-0398 Registered News Paper

Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025

R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025

Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष तिसरे अंक सातवा, ५ जुलै २०२४ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/-

Andhshradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 3 Issue 7, 5th July 2024 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

ISSN : 2584-0398

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

## वर्षभरात वार्षिक विशेषांक आणि १० मासिक अंक मिळवा घरपोच

**बँक तपशील**

वर्गणी/जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट

**'विवेक जागर संस्था'** या समितीच्या प्रकाशन संस्थेच्या नावानेच काढावा.

सोबतचा QR कोड स्कॅन करुन
जाहिरातदार/देणगीदार/वर्गणीदार होऊ शकता

Scan & Pay

**VIVEK JAGAR SANSTHA**
ICICI Bank, Mundada Market, Dhule
A/c No.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R



वार्षिक वर्गणीदार व्हा!
व्यक्तीसाठी रु. ४००/-
संस्थेसाठी रु. ५००/-

- संपर्क – व्यवस्थापकीय संपादक : अजय भालकर (९३५९०८०८२०) अंक वितरक : आरबाज पटेल (७७७६०६१८३३)
- सहकाऱ्यांना मासिकाचे वर्गणीदार व वाचक बनवा तसेच जाहिरात व देणगीरूपाने मदत करा.
- प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला पोस्टाने अंक रवाना केला जातो. अंक १५ तारखेपर्यंत न मिळाल्यास संपर्क करा.
- अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामामध्ये आपला सहभाग सर्व पातळीवर वृद्धिंगत व्हावा हीच अपेक्षा.
- अंकासाठी लेखन साहित्य manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in या ईमेलवर पाठवावे.

**कार्यालयीन पत्ता**

अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली – ४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com, manspatrika@mans.org.in

**Printed Book Post**

**प्रेषक,**
अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

**प्रति,** ____________________

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.